# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2018-2020

YEAR : 45) 1st September 2020 ( No. of Pages 20 ) ( No : 08


# भारताच्या मा. राष्ट्रपतींचीसुद्धा फसवणूक करण्याइतके धैर्य उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांजवळ येते कुठून ?


- प्रा.बी.टी.देशमुख

*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*


**१.** विधिवतरित्या अनुज्ञेय असलेले लाभ शिक्षकांना किंवा कर्मचाऱ्यांना लागू करतांना उच्च शिक्षण विभागातील काही अधिकारी आम्ही म्हणू त्याला देऊ, पूजाअर्चा बरोबर केली नाही तर आम्ही ते लाभ देणार नाही, उच्च न्यायालयातून जरी अनेकांनी न्याय मिळविला तरी त्यातील काहींना आम्ही देऊ, पण इतर काहींच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयात पूनर्विलोकन याचिका दाखल करून पूजाअर्चा करण्यासाठी अशा अर्जदाराला जेरीस आणू, अधिकाऱ्यांची ही वृत्ती स्पष्ट करणारी डझनावारी न्यायालयीन प्रकरणे दाखवून देता येतील.

**२.** विधिवतरित्या अदेय असलेले लाभसुद्धा मंत्रिमंडळाची मान्यता नसली तरी, वित्त विभागाची मान्यता नसली तरी, आम्ही वाटेल त्या अधिकाऱ्याला व कर्मचाऱ्याला देऊ शकतो, ही उच्च शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांची मुजोरी वृत्ती बक्षी समितीच्या अहवालामुळे ठसठशीतपणे जगाच्या समोर आली. सहाव्या वेतन आयोगाने मंजूर केलेल्या वेतनश्रेण्यांपेक्षा कितीतरी मोठ्या प्रमाणात अतिप्रदान करण्याची बहादुरी उच्च शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांनी दाखविलेली होती. याबाबतीत बक्षी समितीच्या अहवालामध्ये समाविष्ट असलेला परिच्छेद ४.६.३ मी जसाच्या तसा उधृत करीत आहे :-

"(४.६.३) **उच्च व तंत्र शिक्षण विभाग (अकृषी विद्यापीठे)** : सर्व विद्यापीठांत शिक्षकेतर पदांच्या ६ व्या वेतन आयोगानुसार मंजूर केलेल्या वेतनश्रेण्यांची तपासणी करून संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांकडून **झालेले अतिप्रदान वसूल करण्याची शिफारस करण्यात येत आहे.** तसेच योग्य त्या कार्यपद्धतीचा अवलंब न करता निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील ज्या पदनामांमध्ये व वेतनश्रेण्यांमध्ये नियमबाह्य बदल केल्यामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे, अशी सर्व पदनामे व त्या पदांना मंजूर केलेल्या वेतनश्रेण्या ७ **व्या वेतन आयोगानुसार सुधारित करण्यापूर्वीच दिनांक ७.१०.२००९ च्या शासन अधिसूचनेनुसार कटाक्षाने पूर्ववत करण्याची कार्यवाही उच्च व तंत्र शिक्षण विभागाने तातडीने करावी, तसेच अशा अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर त्वरीत शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस समिती करीत आहे.**"

**३.** जबाबदार अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा शासननिर्णय या घटनाक्रमातून पुढे निर्गमित झाला. बक्षी समितीची उपरोक्त शिफारस शासनाने मान्य केली. एवढेच नव्हे तर दिनांक ९ जानेवारी २०१९ रोजी एक शासननिर्णय (क्रमांक वेपुर-२०१८/प्र.क्र.४४/सेवा-९) निर्गमित करून याबाबतची प्रत्यक्ष कारवाई सुरू केली. या शासननिर्णयात असे नमूद आहे की, :-

"उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून योग्य त्या कार्यपद्धतीचा अवलंब न करता निर्गमित केलेल्या शासन निर्णयांतील ज्या पदनामांमध्ये व वेतनश्रेण्यांमध्ये नियमबाह्य बदल केल्यामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे, अशी सर्व पदनामे व त्या पदांना मंजूर केलेल्या वेतनश्रेण्या ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित करण्यापूर्वीच दिनांक ७.१०.२००९ च्या शासन अधिसूचनेनुसार कटाक्षाने पूर्ववत करण्याची कार्यवाही उच्च व तंत्र शिक्षण विभागाने तातडीने करावी, **तसेच अशा अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर त्वरीत शिस्तभंगाची कारवाई करावी.**"

कायद्याने देणे लागत असलेल्या गोष्टी आमची पूजाअर्चा केल्याशिवाय आम्ही देणार नाही आणि आमची पूजाअर्चा केली तर कायद्यात बसो न बसो आम्ही काय वाटेल ते देऊ या वृत्तीचा पुरस्कार करणारा एक व एकमेव विभाग म्हणून उच्च शिक्षण विभागाचा उल्लेख करता येईल. बक्षी समितीच्या अहवालामध्ये अशा प्रकारची शिफारस दुसऱ्या कोणत्याही विभागाबाबत करण्यात आलेली नाही, ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे.

**४.** गेल्या आठ-दहा वर्षात उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची हिंमत इतकी वाढली की, देशाच्या मा. राष्ट्रपतींची व केंद्रशासनाची व राज्यमंत्रिमंडळाची फसवणूक करण्याचा प्रकार सुद्धा यातून घडला असे स्पष्टपणे दिसून येते. तो प्रकार पुढीलप्रमाणे :- केंद्रशासनाच्या मानव संसाधन विभागाने दिनांक २६ सप्टेंबर २०१९ रोजी "Reimbursement of central share for implementation of the scheme of revision of pay scales (7th CPC) of university and college teachers to the Govt. of Maharashtra-reg." या विषयावर एक शासकीय अधिसूचना (F.No.1-7/2019-U.II) **(सहपत्र : एक)** निर्गमित केली ***(यापुढे उल्लेख केंद्रशासनाची अधिसूचना असा)*** असून या अधिसूचनेतील परिच्छेद ३ पुढीलप्रमाणे आहेः-

**"3. The sanction of the President is hereby accorded to the payment of Rs.1320,93,04,503/- (Rupees Thirteen Hundred Twenty Crore Ninety Three Lakh Four Thousand Five Hundred Three only)** to State Government of Maharashtra to enable it to meet additional expenditure involved in implementation of the Scheme during the period from 01.01.2016 to 31.03.2019. **This amount would be utilized by the State Govt. in accordance with the terms and conditions stipulated in this Department's letter referred to above."**

**५.** जवळ जवळ १३२० कोटी ९३ लक्ष रुपयांचा निधी महाराष्ट्र शासनाच्या सुपूर्त करण्यास भारताच्या मा. राष्ट्रपतींनी मान्यता दिली. त्याप्रमाणे तो निधी महाराष्ट्र शासनाच्या सुपूर्त करण्यात आला. केंद्रशासनाच्या पत्रात नमूद असलेल्या अटी व शर्तीनुसारच वापर केला जाईल या अटीवर हा निधी मंजूर करण्यात आला आहे, असेही या अधिसूचनेत स्पष्टपणे नमूद आहे. घटनाशास्त्राच्या प्रत्येकच विद्यार्थ्याला याची कल्पना असते की, केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता देऊन प्रस्ताव पाठविल्यानंतरच भारताचे राष्ट्रपती त्यावर शिक्कामोर्तब करतात. केंद्रीय मंत्रिमंडळाने या रकमेला मान्यता दिलेली आहे. अशी मान्यता दिली असल्याबाबतचा स्पष्ट उल्लेख २६ सप्टेंबर २०१९ च्या केंद्रशासनाच्या या अधिसूचनेच्या परिच्छेद १ मध्ये आहे. तो पुढील शब्दातः-

"The Central Government had decided to provide financial assistance to State Governments opting to revise pay scales of teachers and other equivalent cadre, as per above said letters of this Department, by way of reimbursement, to the extent of

***एका बाजूला समग्र योजनेतील अटीशर्तींची मोडतोड करून व दुसऱ्या बाजूला प्रत्यक्षात न केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती मिळवून उच्च शिक्षण विभागातील या अधिकाऱ्यांनी भारताच्या मा.राष्ट्रपतींची व केंद्रीय मंत्रिमंडळाची घोर फसवणूक करण्याचे अपकृत्य केलेले आहे.***

*(लेखाचा परिच्छेद १५ पहा)*

**The sanction of the President is hereby accorded to the payment of Rs.1320,93,04,503/- (Rupees Thirteen Hundred Twenty Crore Ninety Three Lakh Four Thousand Five Hundred Three only) to State Government of Maharashtra to enable it to meet additional expenditure involved in implementation of the Scheme during the period from 01.01.2016 to 31.03.2019.** *( See Para 3 of the Govt of India Notification dated 26.09.2019 )*

50% (fifty percent) of the additional expenditure involved in the implementation of the pay revision, for the universities, colleges and other higher educational institutions funded by the State Government, **for the period from 01.01.2016 to 31.03.2019, subject to fulfillment of prescribed terms and conditions."**

**६.** केंद्रशासनाच्या अधिसूचनेचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास असे दिसून येते की, विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना सातव्या वेतन आयोगाशी समकक्ष विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू केल्यामुळे या शिक्षकांना देय होणारी रक्कम राज्यशासनाने अदा केल्यावर त्या खर्चापैकी ५० टक्के रक्कम परतावा किंवा प्रतिपूर्ती (Reimbursement) या स्वरूपात केंद्रशासनाकडून अर्थसहाय्य म्हणून दिली जाईल. याबाबतचे तपशील केंद्रशासनाच्या अधिसूचनेच्या परिच्छेद 4 (a) मध्ये नमूद आहेत. ते पुढील शब्दात :-

"(a) Financial assistance from the Central Government to State Govemments opting to revise pay scales of teachers and other equivalent cadre covered under the Scheme shall be limited, **by way of reimbursement,** to the extent of 50% (fifty percent) of the additional expenditure involved in the implementation of the pay revision, for the universities, colleges and other higher educational institutions funded by the State Govemment."

**७.** राज्यशासनाने थकबाकी अदा केल्यानंतर ५० टक्के रकमेच्या प्रतिपूर्तीचा प्रस्ताव विहित नमुन्यामध्ये केंद्रशासनाकडे सादर करावयाचा आहे, असेही या अधिसूचनेमध्ये नमूद आहे. ते पुढील शब्दात :-

"(c) The **proposal for reimbursement** on account of pay revision in State funded universities, colleges and other higher educational institutions shall be submitted in the prescribed format by the State Governments."

**८.** केंद्रशासनातर्फे हे जे सहाय्य दिले जात आहे, हे केंद्राची संपूर्ण योजना (Entire Scheme) एक "समग्र योजना" (Composite Scheme) म्हणून कोणताही बदल न करता सर्व अटी व शर्तीसह व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन्ससह राज्यशासनाला अंमलात आणावी लागेल या अटीवरच देण्यात येत आहे, असाही स्पष्ट उल्लेख केंद्रशासनाच्या अधिसूचनेच्या परिच्छेद 4 च्या उपपरिच्छेद (h) मध्ये आहे. तो पुढील शब्दात:-

"(h) Payment of Central assistance for implementing this Scheme is also subject to the condition that the **entire Scheme of revision of pay scales, together with all the conditions to be laid down by the UGC by way of Regulations and other guidelines shall be implemented by State Governments and Universities and Colleges coming under their jurisdiction as a composite scheme without any modification..."**

**९. केंद्रशासनाच्या या अधिसूचनेमध्ये केंद्रशासनाच्या दिनांक २ नोव्हेंबर २०१७ व ८ नोव्हेंबर २०१७ या तारखांच्या दोन पत्रांमधील तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १८ जुलै २०१८ च्या रेग्युलेशन्समधील अटी व शर्ती यांचे पूर्णपणे पालन केल्या जाईल, या अटीवरच हे अनुदान देण्यात येत आहे, असा एक स्वतंत्र परिच्छेद या अधिसूचनेमध्ये आहे.** तो परिच्छेद ५ पुढीलप्रमाणे आहे:-

"5. The grant is further subject to the terms and conditions stipulated in this Ministry's letter No.1-7/2015-U.II(1) dated 2nd November, 2017 & 8th November, 2017 and subsequent instructions/clarifications, if any, issued from time to time and UGC's Notification dated 18th July, 2018."

**१०.** राज्याला हा निधी मंजूर करणाऱ्या केंद्रशासनाच्या या अधिसूचनेची प्रत महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सचिव यांना अग्रेषित करण्यात आली असून या अधिसूचनेच्या परिच्छेद ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती समाविष्ट असलेली योजना राज्यातर्फे जशीच्या तशी अंमलात आणल्या जाईल, या अटीवरच हे अर्थसहाय्य देण्यात आलेले आहे, असे स्पष्टपणे बजावण्यात आलेले आहे. ते पुढील शब्दात :-

"Copy to (1) The Secretary, Higher and Technical Education Department, Govt. of Maharashtra, 411, Mantralaya Annexe, Hutatma Rajguru Chowk, Mumbai - 400 032. It may kindly be noted that implementation of the Scheme of revision of pay scales for teachers and other equivalent cadres in universities/ colleges in Maharashtra shall be subject to the conditions stipulated in Para 4 and 5 of this sanction letter as well as those laid down in the guidelines/regulations/orders that may be issued by the Government of India/UGC in this behalf from time to time."

**११. केंद्रशासनाच्या अधिसूचनेमध्ये नमूद असलेली दोन पत्रे व दिनांक १८ जुलै २०१८ रोजीचे विद्यापीठ अनुदान आयोगाचे रेग्युलेशन्स यांची समग्र योजना म्हणून महाराष्ट्रात अंमलबजावणी करण्यात आलेली आहे, असे सांगून हा निधी आणण्याचा प्रकार हा एक घोर फसवणूकीचा प्रकार आहे.** त्या समग्र योजनेतील अनेक अटींचा महाराष्ट्रात भंग करण्यात आला असून स्वतःच्या पदरच्या अनेक अटी अधिकाऱ्यांनी त्या शासननिर्णयामध्ये टाकल्या आहेत. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने अनेक निवेदने सादर करून ह्या त्रुटी उच्च शिक्षण विभागाच्या लक्षात आणून दिल्या व त्याबाबतीत चर्चा करण्यासाठी वेळ मागितली.

**१२.** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन्सची अशी मोडतोड महाराष्ट्रामध्ये यापूर्वी कधीही करण्यात आलेली नव्हती. हे मा.उच्च शिक्षण मंत्री श्री. विनोद तावडे यांच्या लक्षात आणून देण्यासाठी सोमवार, **दिनांक १ जुलै २०१९ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे सकाळी १२ ते ४ वाजेपावेतो महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या नेतृत्त्वाखाली राज्यस्तरीय धरणे आंदोलन** आयोजित करण्यात आले होते. पूर्व सूचनेने मा. उच्च शिक्षणमंत्र्यांशी वेळ ठरवून चर्चा करावी. संघटनेचे पदाधिकारी आपले म्हणणे मांडतील असे ठरले होते. शिष्टमंडळाशी चर्चा करण्यास शिक्षणमंत्र्यांना वेळ न मिळाल्यामुळे अशी चर्चा होऊ शकली नाही.

**This amount would be utilized by the State Govt. in accordance with the terms and conditions stipulated in this Department's letter referred to above.**

*( See Para 3 of the Govt of India Notification dated 26.09.2019 )*

Payment of Central assistance for implementing this Scheme is also subject to the condition **that the entire Scheme of revision of pay scales,** together with all the conditions to be laid down by the UGC by way of Regulations and other guidelines **shall be implemented** by State Governments and Universities and Colleges coming under their jurisdiction **as a composite scheme without any modification.**

*( See Para 4 (h) of the Govt of India Notification dated 26.09.2019 )*

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्यांची अंमलबजावणी करण्यासाठी जे दोन शासननिर्णय निर्गमित करण्यात आलेले आहेत ते दोनही शासननिर्णय अत्यंत दोषपूर्ण आहेत अशी टिका महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने आपल्या निवेदनात केलेली होती. त्यामुळे उच्च शिक्षण विभागाला जाग आली. त्या विभागाने दिनांक १४ ऑगस्ट २०१९ रोजी एक शासननिर्णय काढून एका समितीची नेमणूक केली. मा. श्री. विनोद तावडे यांनी फक्त सत्ताधारी पक्षाच्या मांडवात हजेरी लावणाऱ्या शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचेच म्हणणे ऐकून घ्या, इतर कोणाचेही म्हणणे ऐकण्याची गरज नाही; अशी अत्यंत चमत्कारिक व विक्षिप्त भूमिका घेतली व तसे आदेश दिले. या लोकशाही विरोधी व चमत्कारिक भूमिकेतून या शासननिर्णयामध्ये आलेला परिच्छेद २ पुढीलप्रमाणे:-

"२. सदरहू समितीपुढे खालील अध्यापक संघटनांचे प्रतिनिधी त्यांचे म्हणणे विस्तृत स्वरूपात व योग्य समर्थनासह सादर करतील.

डॉ. अनिल कुलकर्णी - अध्यक्ष, शैक्षणिक महासंघ महाराष्ट्र राज्य

डॉ. शेखर चंद्रात्रे - सरचिटणीस, शैक्षणिक महासंघ महाराष्ट्र राज्य

डॉ. कल्पना पांडे - सदस्य, शैक्षणिक महासंघ महाराष्ट्र राज्य"

दोषपूर्ण शासननिर्णयावर म्हणणे ऐकून घेण्यासाठी समिती नेमावयाची व त्या समितीच्या नेमणुकीच्या आदेशातच फक्त सत्ताधारी पक्षाच्या छत्राखाली काम करणाऱ्या शिक्षक संघटनेच्या तीन पदाधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे. इतर कोणालाही म्हणणे मांडण्याचीसुद्धा संधी न देणारा शासननिर्णय हा लोकशाहीतील एक चमत्कारच होता. लोकशाही व्यवस्थेमध्ये राज्यकर्त्यांना काय निर्णय घ्यावयाचा असेल तो त्यांनी घ्यावा पण तो निर्णय घेण्यापूर्वी सर्वांचे ऐकून घेण्याचे सुद्धा सौजन्य राज्यकर्त्यांनी दाखवू नये ही बाब चमत्कारिक या सदरात मोडणारी तर आहेच पण लोकशाही व्यवस्थेला निश्चितपणे लाज आणणारीसुद्धा आहे असेच म्हणावे लागेल.

**१३.** या सर्व घटनाक्रमाचा परिणाम असा झाला की, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला उच्च न्यायालयाकडे दाद मागण्याशिवाय पर्याय राहिला नाही. समग्रयोजनेतील कोणकोणत्या व किती अटी शर्तीची मोडतोड करण्यात आली याचे तपशील येथे नमूद करणे विस्तारभयास्तव टाळण्यात येत आहे. **मा. उच्च न्यायालयामध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या याचिकेसोबत एक परिशिष्ट-एफ जोडण्यात आले असून ठळकपणे अटी व शर्तीचा भंग करणाऱ्या १७ बाबी त्या परिशिष्टामध्ये नमूद आहेत. ह्या ठळक बाबी आहेत. अनेक लहान-सहान मोडतोडीचे प्रकार त्या परिशिष्टामध्ये समाविष्ट नाहीत, हे लक्षात आणून देण्यात येत आहे.**

**१४.** सातव्या वेतन आयोगाशी समकक्ष विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नवीन वेतनश्रेण्यांमुळे थकबाकी देतांना येणारा अतिरिक्त खर्च राज्यशासनाने प्रथम करावा व त्यानंतर त्याबाबतचा प्रतिपूर्तीचा प्रस्ताव (proposal for reimbursement) केंद्रशासनाकडे सादर करावा, अशी स्पष्ट तरतूद केंद्रशासनाच्या अधिसूचनेमध्ये व सुरुवातीपासूनच्या सर्व पत्रव्यवहारामध्ये असतांना असा खर्च न करताच तेराशे कोटी रुपयांची रक्कम या अधिकाऱ्यांनी मिळविली. तसे करतांना त्यांनी काय काय केले असेल व हे कशासाठी केले असेल, हे ते अधिकारीच सांगू शकतील. या कामी येणाऱ्या अर्थभारापैकी ५० टक्के अर्थभार केंद्रशासन प्रतिपूर्तीच्या स्वरूपात परतावा (reimbursement) म्हणून देईल, अशी स्पष्ट अट या समग्र योजनेमध्ये असतांना व राज्यमंत्रिमंडळाने त्या अटीस मान्यता दिलेली असतांना उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी हा द्राविडी प्राणायाम करण्याचे कोणतेही कारण नव्हते. "Reimbursement" या शब्दाचा अर्थ आम्हाला समजला नाही, असे या अधिकाऱ्यांचे म्हणणे असेल काय? कोणत्याही लहान-मोठ्या शब्द कोशामध्ये Reimburse या इंग्रजी शब्दाचा अर्थ त्यांनी पाहिला असता तर त्यांना "Refund to a person what he has paid out" (केलेल्या खर्चाची भरपाई करणे) असाच किंवा यासम दिसला असता. उच्च शिक्षण विभागातील प्रत्येक वरिष्ठ अधिकाऱ्याच्या टेबलवर महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने अधिकृतपणे प्रसिद्ध केलेला "शासन व्यवहार कोश" या नावाचा ग्रंथ संदर्भासाठी ठेवलेला असतो. या ग्रंथामध्ये सुद्धा Reimburse या शब्दाचा अर्थ इंग्रजीतच "to repay" असा सांगितला असून पुढे मराठीत सुद्धा "प्रतिपूर्ती करणे" असा सांगितला आहे.

**१५. एका बाजूला समग्र योजनेतील अटीशर्तीची मोडतोड करून व दुसऱ्या बाजूला प्रत्यक्षात न केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती मिळवून उच्च शिक्षण विभागातील या अधिकाऱ्यांनी भारताच्या मा.राष्ट्रपतींची व केंद्रीय मंत्रिमंडळाची घोर फसवणूक करण्याचे अपकृत्य केलेले आहे. अशाप्रकारे मा.राष्ट्रपतींची व केंद्रीय मंत्रिमंडळाची फसवणूक करण्यात अपराधी असलेल्या अधिकाऱ्यांवर कोणीही कारवाई करीत नाही, करू शकत नाही. या बाबीची साधी चौकशी केली जात नाही. जबाबदारी सुद्धा निश्चित होत नाही, ही बाब उच्च शिक्षण विभागात सुरू असलेल्या अराजकतेला चालना देणारी आहे.**

***** ***** *****

**१६. मा.राष्ट्रपतींची व केंद्रीय मंत्रिमंडळाची फसवणूक करून हे अधिकारी गप्प बसले नाहीत, तर ते करण्यापूर्वी त्यांनी राज्य मंत्रिमंडळाची सुद्धा फसवणूक केलेली आहे, अवज्ञा केलेली आहे, असे नमूद करणारे स्पष्ट पुरावे उपलब्ध आहेत.**

**१६.१** राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्याबाबत मंत्रिमंडळाने निर्णय घेतला. त्यातील थकबाकी अदा करण्याचा भाग आजच्या लेखविषयाशी संबंधित असल्यामुळे त्याबाबतची माहिती घेऊ. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करणारे नियम समाविष्ट असलेली अधिसूचना ३० जानेवारी २०१९ च्या महाराष्ट्र शासन राजपत्राच्या असाधारण भाग चार मध्ये प्रकाशित करण्यात आली आहे. त्यातील नियम १४ मध्ये पुढीलप्रमाणे तरतुद आहे :-

**"14. Mode of payment of arrears of pay. —**(1) The arrears of pay entitled to Government servant on account of revision of pay under these Rules, for the period from the 1st day of January 2016 to the 31st day of December 2018 (both inclusive) shall be credited to the General Provident Fund (GPF) or Applicable

**The grant is further subject to the terms and conditions stipulated in this Ministry's letter No.1-7/ 2015-U.II(1) dated 2nd November, 2017 & 8th November, 2017 and subsequent instructions/clarifications, if any, issued from time to time and UGC's Notification dated 18th July, 2018.**

*( See Para 5 of the Govt of India Notification dated 26.09.2019 )*

***मा.राष्ट्रपतींची व केंद्रीय मंत्रिमंडळाची फसवणूक करून हे अधिकारी गप्प बसले नाहीत, तर ते करण्यापूर्वी त्यांनी राज्य मंत्रिमंडळाची सुद्धा फसवणूक केलेली आहे, अवज्ञा केलेली आहे, असे नमूद करणारे स्पष्ट पुरावे उपलब्ध आहेत.***

*(लेखाचा परिच्छेद १६ पहा)*

Pension Scheme, as the case may be, in five equal instalments over the next five years from financial year 2019-2020;"

**१६.२** राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या सोबतच सर्वच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या बाबतीतसुद्धा राज्य मंत्रिमंडळाने निर्णय घेतले. विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवानिवृत्त शिक्षकांसह सर्वच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित सेवानिवृत्तीवेतन लागू करणारा शासननिर्णय दिनांक २४ जानेवारी २०१९ रोजी निर्गमित झाला. त्या शासननिर्णयाच्या परिच्छेद ६ मध्ये थकबाकीबाबत पुढीलप्रमाणे तरतूद आहे :-

"6. Pension should be revised from 1st January 2016. But the pensioners **will get actual benefit of revised pension from 1st January 2019. The arrears due to revision with effect from 1st January 2016 to 31st December 2018 should be paid in cash in five equal instalments over the next five years. The first instalment, due in the year 2019,** will be paid along with monthly pension of the month of June 2019. Further, the **remaining instalments should be paid along with monthly pension of June every year."**

**१७.** सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्याचा राज्यशासनाने निर्णय घेतल्यानंतर (i) शासकीय कर्मचाऱ्यांची थकबाकी अदा करण्याबाबत (ii) सेवानिवृत्तांची थकबाकी अदा करण्याबाबत (iii) विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवानिवृत्त शिक्षकांच्या थकबाकीबाबत राज्य मंत्रिमंडळाने काय निर्णय घेतले व त्याबरहुकूम काय शासननिर्णय निर्गमित करण्यात आले याची माहिती पूर्वपरिच्छेदात दिलेली आहे. या सर्व वर्गासाठी जो खर्च होणार, त्यावर एक रुपयाचे अर्थसहाय्य केंद्रशासनाकडून मिळत नाही. आता ज्या वर्गाच्या बाबतीत जवळ जवळ ५० टक्के म्हणजे तेराशे ते चौदाशे कोटी रुपयांचे अर्थसहाय्य केंद्राकडून मिळू शकते, (आता ते प्रत्यक्ष मिळालेले आहे.) त्या विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्याबाबतीत राज्याच्या मंत्रिमंडळाने काय निर्णय घेतले व त्याबाबत उच्च शिक्षण विभागातील चतुर अधिकाऱ्यांनी कसे शासननिर्णय निर्गमित केले, याची माहिती करून घेऊ.

**१८.** दिनांक ५ मार्च २०१९ रोजी राज्य मंत्रिमंडळाने बैठक क्रमांक २१५ मध्ये या विषयावर घेतलेला निर्णय मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयातील जनसंपर्क कक्षाने अधिकृतपणे त्याच दिवशी जाहीर केला. तो शब्दशः पुढीलप्रमाणे:-

"सातवा वेतन आयोग लागू केल्यामुळे अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील सुमारे २६ हजार ७४१ शिक्षक व शिक्षक समकक्ष पदावरील कर्मचाऱ्यांना याचा लाभ होणार आहे. वेतन आयोगातील तरतुदी १ जानेवारी २०१६ पासून लागू केल्याने ३१ मार्च २०१९ पर्यंत २५८४ कोटी ४७ लाख एवढा वाढीव खर्च येणार असून **त्यामध्ये राज्य शासनाचा ५० टक्के हिस्सा व केंद्र शासनाचा ५० टक्के हिस्सा आहे. या खर्चास मान्यता देण्यात आली असून** १ एप्रिल २०१९ नंतर येणाऱ्या ८०० कोटी रुपयांच्या वाढीव **खर्चासही मान्यता देण्यात आली आहे."**

**१९.** मंत्रिमंडळाच्या निर्णयाचा हा मसुदा काळजीपूर्वक वाचला तर त्यात पुढील निर्णय मंत्रिमंडळाने घेतल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

(१) विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना थकबाकी अदा करण्यापोटी येणाऱ्या एकूण २५८४ कोटी ४७ लाख रुपयाच्या एकूण खर्चाला मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) हा खर्च केल्यावर त्यापैकी ५० टक्के रक्कम (म्हणजे जवळ जवळ तेराशे कोटी रुपये) केंद्रशासनाकडून अर्थसहाय्य म्हणून मिळणार आहे.

(३) उरलेली थकबाकीची ५० टक्के रक्कम राज्यशासन सोसणार आहे.

(४) ३१ मार्च २०१९ पर्यंतची थकबाकी अदा करण्याच्या एकूण खर्चाला मान्यता देण्यात आली असून त्याशिवाय १ एप्रिल २०१९ नंतर प्रत्यक्ष वेतन अदा करण्यासाठीच्या ८०० कोटी रुपयाच्या खर्चालासुद्धा मान्यता देण्यात आली आहे.

**२०.** मंत्रिमंडळाने घेतलेले निर्णय लक्षात घेता उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी याबाबतीत काय कार्यवाही करायला पाहिजे होती, याचा आराखडा पुढीलप्रमाणे सांगत येईल.

(१) मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णयांची इमानेइतबारे अंमलबजावणी करण्यासाठी शासननिर्णयामध्ये तो निर्णय समाविष्ट करणे आवश्यक होते.

(२) या एकाच वर्गाच्या बाबतीत जवळ जवळ १३०० कोटी रुपयांचे अर्थसहाय्य केंद्रशासनाकडून मिळत असल्यामुळे संपूर्ण थकबाकी ही या शिक्षकांना अदा करणे आवश्यक होते.

(३) संपूर्ण थकबाकी अदा केल्यानंतर त्यापैकी ५० टक्के रकमेची प्रतिपूर्ती करण्यात यावी म्हणून प्रतिपूर्तीचा प्रस्ताव (proposal for reimbursement) केंद्रशासनाकडे सादर करणे आवश्यक होते.

**२१.** उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी प्रत्यक्षात काय कृती केली, याचा आढावा घेतला तर असे दिसून येते की, सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे थकबाकी अदा करण्याचा मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय हा शासननिर्णयामध्ये समाविष्ट करावयाचा नाही, असे त्यांनी त्यांच्या स्तरावर ठरवून टाकले व त्याप्रमाणे दिनांक ८ मार्च २०१९ रोजीचा शासननिर्णय निर्गमित करण्यात आला. **निश्चित रकमेसह मंत्रिमंडळाने थकबाकी अदा करण्याच्या ज्या आराखड्याला मान्यता दिली त्याबाबतचे तपशील शासननिर्णयामध्ये समाविष्ट न करण्याची अधिकाऱ्यांची ही कृती सरळ सरळ मंत्रिमंडळाची फसवणूक करणारी तर होतीच पण त्याबरोबरच कमालीच्या शिरजोरपणाचे (gross insubordination) प्रदर्शन करणारीही होती.**

**२२.** दिनांक ५ मार्च २०२० रोजी विद्यमान मा.उच्च शिक्षणमंत्री श्री.उदय सामंत यांनी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या शिष्टमंडळाला चर्चेसाठी बोलाविले होते. **या चर्चेच्या वेळी ही थकबाकी अदा करण्याचा प्रश्न चर्चेला आला असतांना उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी १३०० कोटी रुपयांचे अर्थसहाय्य केंद्रशासनाकडून आपल्याला मिळालेले आहे, अशी माहिती शिष्टमंडळासमक्ष चर्चेच्या वेळी मा. उच्च शिक्षणमंत्र्यांना दिली.** थकबाकी अदा करण्यासाठी जर ही रक्कम केंद्रशासनाकडून आपल्याकडे आलेली आहे, तर मग ती तुम्ही दाबून कशाला ठेवली? असे उच्च शिक्षणमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना खडसावले व ती थकबाकी त्यांना तावडतोब द्या असेही आदेशित केले. आज या गोष्टीला ४ महिन्यांचा काळ होऊन गेला, तरी उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी ही थकबाकी अदा केली नाही व ५ मार्च २०२० रोजीच्या बैठकीचे कार्यवृत्त सुद्धा तयार केले नाही.

***** ***** *****

**२३.** थकबाकी अदा करण्याचा प्रश्न असल्यामुळे सहाव्या व सातव्या वेतन आयोगाच्या वेळी घडलेल्या घटनाक्रमाची तुलनात्मक माहिती आवश्यक वाटते.

**२३.१** दिनांक ५ व ६ फेब्रुवारी २०१३ रोजी मा. मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' या निवासस्थानी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाशी चर्चा आयोजित करण्यात आली होती. त्या चर्चेमध्ये **मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी सरळ सरळ अशी भूमिका घेतली की, "थकबाकीची सर्व रक्कम राज्यशासनाने एकरकमी अदा करावी अशी केंद्राची भूमिका आहे,** त्यानंतरच ते परतावा देतील. अशा स्थितीमध्ये थकबाकीची एवढी मोठी रक्कम राज्यशासनाला देता येणार नाही याचे कारण केंद्राची आर्थिक स्थिती फार अडचणीची आहे. मी स्वतः मा.पंतप्रधानांच्या कार्यालयामध्ये राज्यमंत्री होतो. एवढी मोठी रक्कम केंद्रशासन देऊ शकेल हे शक्य वाटत नाही." त्यावर महासंघातर्फे त्यांना असे सांगण्यात आले की, "दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या वेतन आयोगाच्या

***निश्चित रकमेसह मंत्रिमंडळाने थकबाकी अदा करण्याच्या ज्या आराखड्याला मान्यता दिली त्याबाबतचे तपशील शासननिर्णयामध्ये समाविष्ट न करण्याची अधिकाऱ्यांची ही कृती सरळ सरळ मंत्रिमंडळाची फसवणूक करणारी तर होतीच पण त्याबरोबरच कमालीच्या शिरजोरपणाचे (gross insubordination) प्रदर्शन करणारीही होती.***

*(लेखाचा परिच्छेद २१ पहा)*

**The proposal for reimbursement on account of pay revision in State funded universities, colleges and other higher educational institutions shall be submitted in the prescribed format by the State Governments.**

*( See Para 4 (c) of the Govt of India Notification dated 26.09.2019 )*

वेळी केंद्राने कबूल केलेला थकबाकीचा हिस्सा केंद्रशासनाने राज्यांनी प्रस्ताव सादर केल्यानंतर यापूर्वी अदा केलेला आहे असा आमचा अनुभव आहे. तेव्हा आजच आता सहाव्या वेतन आयोगाच्या वेळी केंद्रशासन आपला हिस्सा देणार नाही असे गृहीत धरून काम करणे योग्य होणार नाही." त्या उपर सुद्धा मा.मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी असे सांगितले की, **"केंद्राकडून किती दिवसात आम्हाला परतावा मिळेल हेही त्यांनी पत्रात सांगितलेले नाही.** केंद्रशासन आर्थिक अडचणीत असल्यामुळे त्यांच्याकडून निधी मिळेल अशी शक्यता अजिबात दिसत नाही. निधी किती दिवसात देऊ हेही त्यांच्या पत्रामध्ये स्पष्टपणे नमूद नाही." "राज्यशासन एकरकमी एवढी मोठी रक्कम देऊ शकत नाही." त्यामुळे १५२६ कोटी रुपयांच्या थकबाकीपैकी ५०० कोटी रुपयांचा पहिला हप्ता आम्ही मार्च २०१३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तरतूद करून वितरित करू. त्याची प्रतिपूर्ती केंद्राकडून झाली की, मग दुसरा हप्ता देण्यासाठी तरतूद करू. दुसऱ्या हप्त्याची प्रतिपूर्ती झाली की, मग तिसरा हप्ता अदा करू" अशी भूमिका त्यांनी मांडली.

**२३.२ त्यावर महासंघातर्फे या बैठकीत अशी भूमिका मांडण्यात आली की, "५०० कोटी रुपयांचा पहिला हप्ता दिल्यावर त्याची प्रतिपूर्ती केंद्रशासन करेल अशी अपेक्षा करणे संपूर्णपणे चुकीचे आहे** कारण त्यांच्या कॅबिनेटने घेतलेल्या निर्णयानुसार त्यांनी जो शासननिर्णय काढलेला आहे, त्यामध्ये स्पष्टपणे नमूद आहे की, सर्व थकबाकी एकमुस्त अदा केल्यानंतर आमच्याकडे प्रतिपूर्तीसाठी राज्यशासनाने प्रस्ताव पाठवावा." "केंद्रशासन निधी देणारे आहे. महाराष्ट्र शासन निधी घेणारे आहे. त्यांच्या अटींबाबतचा ठराव त्यांच्या कॅबिनेटमध्ये मंजूर झालेला आहे, तुमच्या मंत्रिमंडळामध्ये तुम्हाला ठराव करावयाचा आहे. "केंद्राकडून निधी आला नाही तर राज्यशासन ही थकबाकी स्वतः देईल" असे तुम्ही आम्हाला लेखी कबूल केलेले आहे. आज निधी केंद्राकडून उपलब्ध होत आहे तर त्यांच्या अटींचे आपल्याला पालन करावेच लागेल" अशीही भूमिका ठामपणे या बैठकीत महासंघातर्फे मांडण्यात आली.

**२३.३** दिनांक ५ व ६ फेब्रुवारी २०१३ रोजी मा.मुख्यमंत्र्यांशी झालेल्या या चर्चेमध्ये महासंघातर्फे आणखी एक महत्त्वपूर्ण मुद्दा मांडण्यात आला. उत्तरप्रदेश विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक संघाचे समन्वयक डॉ.हृदयनाथ त्रिपाठी विरुद्ध उत्तर प्रदेश शासन या प्रकरणात (No. 64068 of 2011) एक महत्त्वपूर्ण निर्णय अलाहाबाद उच्च न्यायालयामध्ये दिनांक १३ जानेवारी २०१३ रोजी झालेला होता. उत्तर प्रदेश शासनाने **"केंद्राकडून निधी आल्यावर आम्ही थकबाकी देऊ"** असे आदेश २१ ऑगस्ट २०११ रोजी काढले होते. **उत्तर प्रदेश शासनाचा हा आदेश मा. उच्च न्यायालयाने रद्दबादल ठरविला व एकमुस्त थकबाकी देण्याचे पुढील शब्दात आदेशित केले.**:- "In view of the aforesaid facts, we are of the view that the **stand taken by the State Government in the impugned order is wholly erroneous and cannot be sustained.** The proper course available to the State Government is first to pay the amount pursuant to the recommendations of the UGC, which admittedly has been accepted by the State Government and thereafter shall apply to the Central Government for reimbursement of the amount so incurred towards the payment of arrears of salary. **For the reasons aforesaid, the impugned order dated 21.8.2011 is liable to be quashed. Accordingly, impugned order dated 21.8.2011 is hereby quashed."**

**२३.४ महासंघातर्फे हायकोर्टाचा निर्णय समजावून सांगण्याचा बराच प्रयत्न करण्यात आला पण मा.मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण ऐकून घ्यायला तयारच नव्हते.** तसे शब्द त्यांनी वापरले नाही पण एकंदर त्यांची देहबोली अशी होती की, "ते हायकोर्टाच वगैरे मला काही सांगू नका. काय तुम्हाला त्यावर कोर्टकचेरी करावयाची असेल ती तुम्ही करून घ्या." त्यांच्याच पक्षाचे केंद्रसरकार आणि त्यांच्याच पक्षाचे पंतप्रधान व केंद्रीय मानव संसाधन मंत्री असतांना १५०० ते १६०० कोटी रुपयांचे केंद्राचे अनुदान घेण्यासाठीच्या केंद्रशासनाच्या सूचना मान्य करायला ते तयार नव्हते व "५०० कोटींचा पहिला हप्ता आम्ही देऊ" असा आग्रह धरून बसले होते. शब्दात मुख्यमंत्री तसे बोलले नाहीत. पण पूर्वीचे मा.मुख्यमंत्री श्री.अशोकराव चव्हाण व मा.उच्च शिक्षण मंत्री श्री. राजेश टोपे यांनी राज्याच्या मुख्य सचिवांना मध्ये घालून थकबाकी अदा करण्याबाबतचे जे लेखी आश्वासन महासंघाला दिले होते ती गोष्ट त्यांना आवडलेली नव्हती. श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी थकबाकी अदा करण्याबाबत जी भूमिका घेतली होती ती केवळ शिक्षकांच्या विरोधातच नव्हती तर शिक्षक या वर्गाविषयी ओतप्रोत द्वेषाने भरलेली होती व त्यामुळेच ते "केंद्रशासन निधी देऊ शकणार नाही, केंद्रशासनाची आर्थिक स्थिती बरोबर नाही" अशी अत्यंत चुकीची भूमिका कवटाळून बसले होते. चर्चेमध्ये एकवेळ अशी आली की, मुख्यमंत्री तेच ते बोलत होते व त्यावर महासंघाचे प्रतिनिधी आपले तेच ते म्हणणे मांडत होते. शेवटी महासंघातर्फे **"आजच्या चर्चेचे जे काय कार्यवृत्त असेल ते आम्हाला द्या म्हणजे मग आम्हाला त्याबाबत निश्चित भूमिका घेता येईल"** असे सांगण्यात आले व तेथेच ती चर्चा संपली. पुढे त्यांनी त्यांचे म्हणणे लेखी पाठविले.

**२३.५** परीक्षा बहिष्कार आंदोलन सुरूच होते. त्यामुळे त्यातल्या त्यात लवकर म्हणजे ९ फेब्रुवारी २०१३ रोजी **"मा. मुख्यमंत्री यांच्या कडे दि.६.२.२०१३ रोजी एमफुक्टो या शिक्षकसंघटनेसमवेत झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त.."** या मथळ्याचे कार्यवृत्त महासंघाच्या अध्यक्षांना उच्च शिक्षण विभागाच्या पत्रान्वये प्राप्त झाले. यामध्ये थकबाकी अदा करण्याबाबत पुढीलप्रमाणे नमूद होते :- "केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या दि. ३१.१२.२००८ च्या आदेशामध्ये उक्त ८० टक्के रक्कम केंद्रीय अर्थसहाय्य म्हणून राज्य शासनास देण्यात येईल असे स्पष्ट केले होते. **तथापि, दि. १४.०८.२०१२ च्या पत्रान्वये मात्र वरील ८० टक्के रक्कम प्रथम राज्य शासनाने अदा करावी. त्यानंतर सदर रक्कमेची प्रतिपूर्ती २ ते ३ हप्त्यामध्ये राज्य शासनास करण्यात येईल असे कळविले आहे.** सदर २ ते ३ हप्त्यातील रक्कम किती कालावधीत राज्य शासनास अदा करण्यात येईल, त्याबाबत केंद्र शासनाच्या पत्रात कोणतेही भाष्य केले नाही. **तसेच केंद्र शासनाने दि. १४.११.२०१२ च्या पत्रान्वये संबंधित अध्यापकांना केंद्र शासनाच्या ८० टक्के हिस्स्याची रक्कम अदा केल्याचे प्रमाणपत्र सादर करण्यास सांगितले आहे.** केंद्र शासनाचे वरील धोरण विचारात घेता सदर रु. १५२६.५० कोटी इतक्या रक्कमेपैकी रुपये ५००.०० कोटी इतक्या रक्कमेचा पहिला हप्ता मार्च, २०१३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तरतूद करून वितरीत करण्यात येईल. तदनंतर सदर रक्कमेची प्रतिपूर्ती करण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल व **केंद्र शासनाकडून जेवढ्या रक्कमेची प्रतिपूर्ती होईल, तेवढी रक्कम राज्य शासनाकडून दुसरा हप्ता देण्यासाठी आगामी अधिवेशनात तरतूद करून सदर रक्कम वितरीत करण्यात येईल."**

**२३.६** या आंदोलनामध्ये एका बाजूला राज्यशासनातर्फे प्राध्यापकांना दोष देण्यात येत होता तर दुसऱ्या बाजूला केंद्रशासनाविषयी अफवा उठविल्या जात होत्या. हस्तेपरहस्ते महाराष्ट्रावर आलेल्या या संकटाला केंद्रसरकार जबाबदार आहे अशी भावना पसरविण्याचा प्रयत्न राज्यशासनातील काही शीर्षस्थ नेते करीत होते. केंद्रसरकारची आर्थिक स्थिती ही काही फार चांगली नाही, त्यामुळे

***मा. उच्च न्यायालयामध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या याचिकेसोबत एक परिशिष्ट-एफ जोडण्यात आले असून ठळकपणे अटी व शर्तींचा भंग करणाऱ्या १७ बाबी त्या परिशिष्टामध्ये नमूद आहेत. ह्या ठळक बाबी आहेत.***

*(लेखाचा परिच्छेद १३ पहा)*

***त्या समितीने "No Work, No Pay" हे सर्वोच्च न्यायालयाचे निदेश येथे लागू होत नाही... ७१ दिवसाच्या काळातील थकित वेतन अध्यापकांना देण्यात येईल'' असा निर्णय एकमताने घेतला. त्यात सचिव व उच्च शिक्षण संचालक हे दोघेही सहभागी होते आणि ''या शिक्षकांना ७१ दिवसाचे वेतन देण्यात येऊ नये'' अशी पूनर्विलोकन याचिका (Review Petition) उच्च न्यायालयात दाखल करणाऱ्या याचिकेमध्ये पहिले याचिकाकर्ते उच्च शिक्षण विभागाचे सचिव होते व दुसरे याचिकाकर्ते हे उच्च शिक्षण संचालक होते.***

*(लेखाचा परिच्छेद ३३ पहा)*

त्यांच्याकडून वेळेवर परतावा मिळेल असे सांगता येत नाही असे स्वतः मुख्यमंत्री सांगत होते. "सदर रक्कम किती कालावधीत राज्यशासनाला अदा करण्यात येईल त्याबाबतीत केंद्रशासनाच्या पत्रात कोणतेही भाष्य केलेले नाही" असे राज्यशासनाने महासंघाला लेखी कळविले होते. या अफवा हस्तेपरहस्ते केंद्रशासनातील नेत्यांच्या कानावरसुद्धा गेलेल्या होत्या.

२३.७ केंद्रीय मंत्रिमंडळातील ज्येष्ठ नेते श्री. शरदराव पवार यांच्या कानावर ज्या वेळेला या बातम्या गेल्या तेव्हा त्यांनी त्याची अत्यंत गांभीर्याने दखल घेतली व केंद्रशासनाचे उत्तरदायित्व प्रभावीपणे व परिणामकारकरित्या पार पाडले जाईल असा निर्णय घेतला व तितक्याच प्रभावीपणे व परिणामकारकपणे तो जाहीर केला. नवी दिल्ली येथे त्यांच्या निवासस्थानी ते स्वतः व केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री श्री.डॉ.एम.पल्लमराजू यांची बैठक आयोजित करण्यात आली. या दोन उभय ज्येष्ठ मंत्र्याशिवाय राज्याचे उच्च शिक्षण विभागाचे प्रधान सचिव श्री. संजीव कुमार व मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे सचिव श्री. अशोक ठाकूर हे या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीचे कार्यवृत्त अधिकृतपणे महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क संचालनालयाच्या अंतर्गत काम करणाऱ्या नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्रामार्फत दिनांक १ एप्रिल २०१३ रोजी प्रसिद्ध करण्यात आले. **"प्राध्यापकांच्या थकबाकी वेतनाचा गुंता : पवार - पल्लमराजू यांच्या बैठकीत सुटला. १५०० कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय**" या मथळ्याचे एक अधिकृत पत्रक महाराष्ट्र परिचय केंद्रातर्फे प्रसिद्ध करण्यात आले. त्यातील महत्त्वाचा परिच्छेद पुढीलप्रमाणे होता :- "**केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री डॉ. एम्.पल्लमराजू यांनी स्पष्ट केले की, केंद्र शासन राज्य शासनाला एकूण वेतन रकमेतील १५०० कोटीचा मोबदला देण्यास तयार आहे. महाराष्ट्र शासनाने निधी मंजूर केल्याबरोबर १५०० कोटीची अर्थात ८० टक्के केंद्राची मदत जारी केली जाईल.**" महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत परिचय केंद्रातर्फे हे प्रसिद्धी पत्रक वृत्तपत्रांना पाठविण्यात आले. त्यासोबत अधिकृतपणे "केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार आणि केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री डॉ. एम्. पल्लमराजू राज्यातील प्राध्यापकांच्या संपाबाबत चर्चा करतांनाचा फोटो सोबत जोडला आहे" असे नमूद करण्यात आले होते.

२३.७ दिनांक ८ मे २०१३ रोजीची एक महत्त्वाची दुर्घटना नमूद केली पाहिजे. केंद्रशासन एवढे सहकार्य करायला तयार आहे. १५०० कोटी रुपयाचे अर्थसहाय्य महाराष्ट्र शासनाने प्रस्ताव सादर केल्याबरोबर देण्यास तयार आहे. ५०० कोटी रुपयाला महाराष्ट्र मंत्रिमंडळाने पूर्वीच मान्यता दिली होती. आणखी एक हजार कोटी रुपयाला मंत्रिमंडळाने मान्यता दिली तर थकबाकी अदा करून प्रस्ताव केंद्रशासनाकडे तातडीने पाठविता येईल. या भावनेने काही मंत्र्यांच्या आग्रहावरून दिनांक ८ मे २०१३ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर एक हजार कोटी रुपयाचा प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. **त्यादिवशीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत तो प्रस्ताव फेटाळण्यात आला.** तत्परतेने पुढाकार घेऊन दिल्लीतील घडामोडी घडवून आणल्यामुळे हे सारे श्रेय शरदराव पवारांना जाईल म्हणून श्री. पृथ्वीराज चव्हाणांच्या चिथावणीवरून काही मंत्र्यांनी केलेल्या विरोधामुळे हा प्रस्ताव फेटाळला गेल्याच्या बातम्या दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रात ठळकपणे प्रकाशित झाल्या होत्या. श्रेयवादासाठीच श्री. पृथ्वीराज चव्हाण या अपकृत्याचे नेतृत्त्व करीत होते याबाबत वेगवेगळी मते व्यक्त केली जात होती. ते काही का असेना, केंद्रातील दोन ज्येष्ठ मंत्र्यांनी थकबाकी अदा करण्यासाठी केलेली मेहनत मंत्रिमंडळाच्या या निर्णयामुळे संपूर्णपणे उध्वस्त झाली, ही ऐतिहासिक वस्तुस्थिती होती.

२३.८ प्रत्यक्षात फक्त ५०० कोटी रुपयालाच मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली होती. दिनांक ८ मे २०१३ रोजी मंत्रिमंडळाची जी बैठक झाली त्यामध्ये उर्वरित एक हजार कोटीचा प्रस्ताव फेटाळण्यात आला. हे वृत्त दिनांक ९ मे रोजीच्या सर्वच वृत्तपत्रातून जाहीर झाले होते. दिनांक १० मे २०१३ रोजी हे प्रकरण मुंबई उच्च न्यायालयासमोर सुनावणीस आले. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या शपथपत्रामध्ये हा पहिलाच मुद्दा होता व खंडपीठासमोर ज्यावेळेला सुनावणी सुरू झाली त्यावेळेला खंडपीठाने शासनाच्या वकिलांना याबाबत विचारणा केली असता सरकारच्या वकिलांनी ५०० कोटी रुपयांचा पहिला हप्ता द्यायला आम्ही तयार आहोत असे सांगितले. मा. मुख्य न्यायमूर्तींनी अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निर्णय झालेला असून त्यावर सर्वोच्च न्यायालयात अपिलही झालेले नाही. तेव्हा ५०० कोटी रुपयांचे न सांगता एकूण १५०० कोटी रुपयांची थकबाकी केव्हा देणार ते स्पष्ट सांगा असे विचारले. ही सर्व सुनावणी होत असतांना खंडपीठाने जवळ जवळ असे सुनावले की, तुम्ही याबाबतीत स्पष्ट भूमिका घेत नसाल तर आम्हाला आदेश द्यावे लागतील. सरकारी वकिलांनी तेथे उपस्थित असलेले उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव श्री.जी.एस. रसाळ यांच्याशी चर्चा केली. रसाळ यांनी बाहेर जाऊन शासनात कोणाशी तरी फोनाफोनी केली. रसाळ हे पुन्हा परत आले आणि त्यांनी सरकारी वकिलांच्या कानात काहीतरी सांगितले आणि मग शासनाची भूमिका सरकारी वकिलांनी खंडपीठासमोर मांडली. उपरोक्त 'आँखो देखा हाल' हा काही जसाच्या तसा मा.खंडपीठाच्या आदेशामध्ये नमूद व्हावा असे अपेक्षीत नसते. पण या आदेशामध्ये जे शब्द मा.खंडपीठाने वापरले ते वाचले म्हणजे जे चित्र डोळ्यांसमोर उभे राहते तो "आँखो देखा हाल"च आहे. मा.खंडपीठाच्या आदेशातील त्याबाबतचा परिच्छेद २ पुढीलप्रमाणे :-

**"2)** So far as the first demand is concerned, Dr.Mukhopadhyay has given the past events. We do not propose to go into the dates and events referred to in the affidavit but we record the statement being made by Mr. Saluja, learned A.G.P. under instructions of Mr. G. S. Rasal, Joint Secretary to the Government of Maharashtra, Higher Education and Technical Education Department, that the **arrears of salary on the basis of 6th Pay Commission recommendations have partly been paid in March 2013 and that the balance amounts will be released by 31 July 2013."**

सारांश काय तर सहाव्या वेतन आयोगाच्या वेळी केंद्राकडून परतावा मिळणार नाही म्हणून एकमुस्त थकबाकी अदा करण्याचा प्रस्ताव मा. मुख्यमंत्र्यांनी फेटाळून लावला, मंत्रिमंडळाने दिनांक ८ मे २०१३ रोजी फेटाळून लावला. मात्र सहसचिव दर्जाच्या अधिकाऱ्याने थकबाकी एकरकमी देण्याचे दिनांक १० मे २०१३ रोजी मा. उच्च न्यायालयात सांगितले. त्याप्रमाणे थकबाकी मिळाली. सातव्या वेतन आयोगाच्या वेळेस केंद्राच्या योजनेप्रमाणे एकरकमी थकबाकी देण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळाने दिनांक ५ मार्च २०१९ रोजीच्या बैठकीत मान्य केला. मुख्यमंत्र्यांनी तो त्याच दिवशी अधिकृतपणे जाहीर केला. केंद्राने आपला पूर्ण हिस्सा म्हणजे तेराशे कोटी रुपयापेक्षा जास्त निधी २९.९.२०१९ रोजी राज्यशासनाच्या सुपूर्त केला. त्यावर अधिकारी वेटोळे घालून बसल्यामुळे एक रुपयाची थकबाकी विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना मिळाली नाही.

२४. मा. अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निर्णय तर होताच, त्याशिवाय मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या वेगवेगळ्या खंडपीठांनी दिलेल्या तीन ते चार निर्णयांची शासन अंमलबजावणी करीत नाही या कारणामुळे व इतर मागण्यांसह विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांवर सन २०१३ मध्ये आंदोलन करण्याची वेळ आली होती. विद्यापीठांच्या परीक्षेच्या कामाशी सहकार्य न करण्याचे ते

***शासनाने नेमलेल्या समितीमध्ये एकमताने ''७१ दिवसाचे रोखलेले वेतन देण्यात यावे'' असा निर्णय करणाऱ्या अधिकाऱ्यांनीच मा. सर्वोच्च न्यायालयात ''ते देण्यात येऊ नये'' म्हणून विशेष अनुमती याचिका दाखल केली.***

*(लेखाचा परिच्छेद ३५ पहा)*

***सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय तर दूरच राहिला पण उच्च न्यायालयाच्या निर्णयावरसुद्धा स्थगनादेश मिळाला नसेल तर त्याची अंमलबजावणी करणे हे बंधनकारक आहे व ते घटनात्मक बंधन आहे. याची स्पष्ट जाणीव करून देणारे आदेश मुख्य सचिव, विधी व न्याय विभागाचे सचिव, वित्त विभागाचे सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सचिव यांनी दिलेले असतांना या सर्व आदेशांचा भंग करणारे कोण अधिकारी उच्च शिक्षण विभागात बसलेले आहेत?***

*(लेखाचा परिच्छेद ४५ पहा)*

आंदोलन जवळ जवळ ७१ दिवस चालले. आंदोलन चालू असतांना उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी सर्व विद्यापीठांना लेखी पत्रे पाठवून असे कळविले होते की, परीक्षेच्या कामाशी असहकार करणाऱ्या शिक्षकांवर कारवाई करण्याचे अधिकार कायद्याने तुम्हाला दिलेले आहेत, तेव्हा तुम्ही याबाबतीत कारवाई करा. काही विद्यापीठांनी त्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीसेस शिक्षकांना दिल्यात.

**२५.** हे सर्व प्रकरण दिनांक १० मे २०१३ रोजी मा. मुख्य न्यायाधिशांच्या अध्यक्षतेखालील उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठासमोर सुनावणीसाठी आले, तेव्हा खंडपीठाने शिक्षकांच्या बहुसंख्य मागण्या ह्या योग्य असून त्यांची मुदतबंद पूर्तता करण्यात यावी असे आदेशित करणारा २५ परिच्छेदांचा एक तपशीलवार निर्णय पारित केला. मा. उच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयांची हे शासन अंमलबजावणी करीत नसल्याबद्दल ते निर्णय नमूद करून आपल्या निकालाच्या परिच्छेद १४ मध्ये मा.खंडपीठाने पुढीलप्रमाणे आदेश पारित केले:-

"If the above Judgments are not disturbed by the Supreme Court, then there can be no manner of doubt that the State Government and the Universities are bound to implement the directions given in the above judgments."

न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास शासन तयार असेल किंवा मा.उच्च न्यायालय तसे आदेश देत असेल तर आंदोलन मागे घेण्यास आम्हाला आनंद वाटेल, अशा अर्थाचे शपथपत्र महासंघाने दाखलच केलेले होते.

**२६. न्यायालयातच शिक्षक संघटनेने परीक्षेच्या कामाशी सहकार्य करण्याचे मान्य केलेले असल्यामुळे विद्यापीठांनी आता कारणे दाखवा नोटीसेस मागे घ्याव्यात अशा प्रकारचे आदेश सुद्धा मा.उच्च न्यायालयाने दिलेत. त्याप्रमाणे सर्व विद्यापीठांनी कारणे दाखवा नोटीसेस मागे घेतल्या. शिक्षकांनी परीक्षेच्या कामाशी उत्तम सहकार्य केले. परीक्षेचे निकालसुद्धा लागले. पण सुडबुद्धीची कारवाई म्हणून या ७१ दिवसांचे वेतन अदा करू नये अशाप्रकारचा हेका उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी सुरूच ठेवला.** ते आदेश मागे घेतले नाही व त्याची अंमलबजावणी कठोरपणे सुरू ठेवली. उघड उघडपणे ही सुडबुद्धीची कारवाई होती. त्यामुळे महासंघाने त्याच वर्षी मा. उच्च न्यायालयासमोर याचिका (W.P. No. 1913 of 2013) दाखल केली.

**२७.** त्यानंतर पुढच्या दोन-चार वर्षातील याबाबतचा घटनाक्रम नमूद करण्याची आवश्यकता नाही. मात्र २५ सप्टेंबर २०१८ रोजी झालेल्या एका बैठकीचा व त्यानंतरच्या घटनाक्रमाचा तपशीलवार उल्लेख करणे आवश्यक आहे. १० मार्च २०१६ च्या शासननिर्णयाने राज्यस्तरीय तक्रार निवारण समिती निर्माण करण्यात आली होती. अशा प्रकारची समिती ही निरुपयोगी आहे असे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने कळविले होते. हे सर्व प्रकरण या समितीसमोर दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजीच्या बैठकीत सुनावणीस ठेवण्यात आले. सहकार्य करावयाच्या भावनेने महासंघाने या बैठकीस उपस्थित राहून आपले म्हणणे मांडले. या समितीच्या अध्यक्षस्थानी मा. उच्च शिक्षणमंत्री हे होते. या समितीचे सदस्य असलेले महत्त्वाच्या खात्यांचे अप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव या बैठकीला उपस्थित होते. त्यांची नावे पुढीलप्रमाणे :-

(१) श्री. सीताराम कुंटे, अपर मुख्य सचिव, सेवा, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय (२) श्री. राजीव कु. मित्तल, सचिव, व्यय, वित्त विभाग, मंत्रालय (३) श्री. सौरभ विजय, सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय (४) श्री. सिद्धार्थ खरात, सहसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय (५) श्रीम. रोहिणी भालेकर, उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय (६) डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे, मंत्रालय (७) श्री. विजय साबळे, अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय

**२८.** दिनांक २५.९.२०१६ रोजीच्या बैठकीचे कार्यवृत्त मा.उच्च न्यायालयासमोर दाखल करण्यात आले असून त्यात समितीच्या या बैठकीला कोण उपस्थित होते हे नमूद आहे. ७१ दिवसाच्या वेतनाबाबत या समितीमध्ये एकमताने निर्णय झाला व असा समितीचा निर्णय झाल्यानंतर याबाबत मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी काय निदेश दिले तेही या कार्यवृत्तामध्ये नमूद आहे. ते पुढीलप्रमाणे:-

"**विषय :- ७१ दिवसांच्या संप काळातील थकीत वेतन मिळावे. : मा. मंत्री यांचे निदेश :-** ७१ दिवसांच्या संप काळातील थकीत वेतनाबाबत वस्तुस्थिती दर्शक प्रस्ताव याचा अर्थ अध्यापकांनी परीक्षा काळातील काम हे उशीरा का होईना पण पूर्ण केले असून त्याला मा. सर्वोच्च न्यायालयाचे No work no pay हे निर्देश लागू होत नाहीत. तरी याबाबत विभागाकडून वित्त विभागाला परत गेलेली रक्कम विभागाला परत मिळावी जेणेकरून ७१ **दिवसांच्या संप काळातील थकीत वेतन अध्यापकांना देण्यात येईल.**"

**२९.** समितीच्या बैठकीमध्ये त्या समितीचे सदस्य म्हणून एकमताने निर्णय घेणारे अधिकारी पुढच्या काळामध्ये या निर्णयाच्या विरोधात कारवाया करीत होते, ही गोष्ट पुढे मा. उच्च व सर्वोच्च न्यायालयातील घटनाक्रमामध्ये पुरतेपणी स्पष्ट झाली. सुडबुद्धीच्या कारवाईबरोबरच विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांविषयीच्या द्वेषबुद्धीने सुद्धा या कारवाया ओतप्रोत भरलेल्या होत्या. हे द्वेषबुद्धीचे सारे नमुने दाखल करणे बरेच श्रमपूर्वक करावयाचे काम आहे. मात्र त्यापैकी एखादा 'नमुनेदार नमुना' या द्वेषबुद्धीचा दर्जा दाखविण्यास पुरेसा होईल. "प्राध्यापकांचा संप" व "प्राध्यापकांचा परीक्षेच्या कामाशी असहकार" या दोन शब्दरचनांमधील फरक या अधिकाऱ्यांना कळत नव्हता, अशातला भाग नाही. मात्र ते द्वेषपूर्वक कार्यवृत्तापासून तर न्यायालयासमोरील कामकाजापर्यंत "संप" याच शब्दाचा वापर करीत होते.

**३०.** सुडबुद्धीच्या व द्वेषबुद्धीच्या कचाट्यात सापडल्यामुळे समितीच्या एकमताच्या निर्णयाबाबत व मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या निदेशाबाबत कोणतीही कारवाई होत नव्हती. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठासमोर सन २०१३ ची याचिका क्रमांक १९१३ ही दिनांक २३ जानेवारी २०१९ रोजी सुनावणीसाठी आली. विभाग प्रमुख या नात्याने मंत्र्यांनी निदेश देऊनही त्याची अंमलबजावणी होत नाही ही एक मोठी आश्चर्याची गोष्ट न्यायालयासमोर आली. दुसरी गोष्ट म्हणजे परीक्षेच्या कामाशी असहकाराला शासनातर्फे, संप असे संबोधल्या जात आहे, याचेसुद्धा मा. न्यायालयाला आश्चर्य वाटले व न्यायालयाने त्यादिवशी याबाबतीत पुढीलप्रमाणे आदेश पारित केले :-

"P.C. : Having heard both sides and finding that issue raised in these Petitions **is resolved at a joint meeting** of all the stakeholders, including the members of the petitioner's association, what remains is to pay the amount equivalent to 71 days salary for the period **which was according to the respondents a strike.**

2. Now, that the issue has been resolved and it is agreed that the pay for this duration has to be released, we direct that in terms of the decision taken in the meeting held on 25/09/2018 (see Minutes of 08/10/2018) amount be released as

***दिनांक २३ जानेवारी २०१९ रोजी मा. उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर भारतीय संविधानातील तरतुदींप्रमाणे उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी जी कारवाई करायला पाहिजे होती, ती त्यांनी आजतागायत केली नाही व संविधानातील तरतुदींचा सतत भंग केला.***

*(लेखाचा परिच्छेद ३६ पहा)*

*सारांश काय तर सहाव्या वेतन आयोगाच्या वेळी केंद्राकडून परतावा मिळणार नाही म्हणून एकमुस्त थकबाकी अदा करण्याचा प्रस्ताव मा. मुख्यमंत्र्यांनी फेटाळून लावला, मंत्रिमंडळानेही तो प्रस्ताव दिनांक ८ मे २०१३ रोजी फेटाळून लावला.*

***मात्र सहसचिव दर्जाच्या अधिकाऱ्याने थकबाकी एकरकमी देण्याचे दिनांक १० मे २०१३ रोजी मा. उच्च न्यायालयात सांगितले. त्याप्रमाणे थकबाकी मिळाली.***

*सातव्या वेतन आयोगाच्या वेळेस केंद्राच्या योजनेप्रमाणे एकरकमी थकबाकी देण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळाने दिनांक ५ मार्च २०१९ रोजीच्या बैठकीत मान्य केला. मुख्यमंत्र्यांनी तो त्याच दिवशी अधिकृतपणे जाहीर केला. केंद्राने आपला पूर्ण हिस्सा म्हणजे तेराशे कोटी रुपयापेक्षा जास्त निधी २९.९.२०१९ रोजी राज्यशासनाच्या सुपूर्त केला.*

***त्यावर अधिकारी वेटोळे घालून बसल्यामुळे एक रुपयाची थकबाकी विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना मिळाली नाही.***

*(लेखाचा परिच्छेद २३.८ पहा)*

expeditiously as possible and, in any event, before 30/03/2019. The Writ Petitions are disposed of with these directions."

**३१.** मा. उच्च न्यायालयाचा हा निर्णय काळजीपूर्वक वाचला तर उच्च शिक्षण मंत्रालयातील जे तज्ज्ञ लोक या "परीक्षा असहकार" आंदोलनाला "प्राध्यापकांचा संप" म्हणून कुत्सितपणे संबोधत होते, त्यांना मा. न्यायालयाने चांगलीच चपराक लगावली होती. "हे शहाणे त्याला संप म्हणत आहेत." (The period which was according to the respondents a strike.) असा तिरकस उल्लेख या निर्णयात आहे. आणखी मौजेची गोष्ट म्हणजे मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी जे निदेश दिले त्याची अंमलबजावणी त्यांना करता आली नाही, मात्र उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे त्यांच्या निदेशाची अंमलबजावणी तीन महिन्यात करण्याचे बंधन शासनावर पडले. **खरे म्हणजे उच्च शिक्षणमंत्र्यांच्या निदेशाची अंमलबजावणी उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे का होईना झालेली आहे याचा आनंद होण्याऐवजी उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी मुंबई खंडपीठासमोर पूर्नविलोकन याचिका दाखल करण्याचा निर्णय घेतला.**

**३२.** उच्च शिक्षण विभागाने दाखल केलेली ही पूनर्विलोकन याचिका म्हणजे सन २०१९ ची पूनर्विलोकन याचिका क्रमांक ३३ होय. (R. P. (L) 33 of 2019) खरे म्हणजे **मा.उच्च न्यायालयातील कामकाजाकडे उच्च शिक्षण विभागातील अधिकारी किती निष्काळजीपणे पहातात याचा पुरावाच या याचिकेमध्ये आपल्याला दिसून येतो. शासनाच्यावतीने न्यायालयासमोर बिनशर्त क्षमायाचना करावी लागली. खरी वस्तुस्थिती आम्ही न्यायालयासमोर ठेवली नव्हती, हेही शासनातर्फे मान्य करण्यात आले.** शासनाच्या या पूनर्विलोकन याचिकेच्या परिच्छेद ६ मधील पुढील उल्लेख पहाः-

"6. At the outset, the Applicants render an unconditional apology to this Hon'ble Court for not being able to place before this Hon'ble Court true and correct facts, at the time when the aforesaid Order itself was passed by this Hon'ble Court."

**या प्रकरणाच्या सुनावणीच्या वेळी खरी व बिनचूक माहिती आम्ही न्यायालयासमोर ठेवली नाही म्हणून उच्च शिक्षण विभागाला बिनशर्त क्षमायाचना करावी लागली ही बाब उच्च शिक्षण विभागाची शोभा वाढविणारी नाही.** पण खरी गंमत त्यापुढे आहे.

**३३.** स्वतः उच्च शिक्षण विभागाचे सचिव व शिक्षण संचालक उच्च शिक्षण हे २५ सप्टेंबर २०१८ च्या समितीच्या बैठकीला उपस्थित होते. तशी कार्यवृत्तात नोंद आहे. ते कार्यवृत्त मा.उच्च न्यायालयात सादर झालेले आहे. **त्या समितीने "No Work, No Pay" हे सर्वोच्च न्यायालयाचे निदेश येथे लागू होत नाही... ७१ दिवसाच्या काळातील थकित वेतन अध्यापकांना देण्यात येईल" असा निर्णय एकमताने घेतला. त्यात उच्च शिक्षण सचिव व उच्च शिक्षण संचालक हे दोघेही सहभागी होते आणि "या शिक्षकांना ७१ दिवसाचे वेतन देण्यात येऊ नये" अशी पूर्नविलोकन याचिका (Review Petition)** उच्च **न्यायालयात दाखल करणाऱ्या याचिकेमध्ये पहिले याचिकाकर्ते उच्च शिक्षण विभागाचे सचिव होते व दुसरे याचिकाकर्ते हे उच्च शिक्षण संचालक होते. अत्यंत हीन दर्जाच्या दुतोंडीपणाच्या या दोन अधिकाऱ्यांच्या वर्तनाने शासनाची केवढी प्रतिष्ठा वाढली याचा विचार शासन केव्हातरी करील, अशी अपेक्षा आपण करू या.**

**३४.** राज्यशासनाची ही पूनर्विलोकन याचिका मा. उच्च न्यायालयासमोर दिनांक ८ नोव्हेंबर २०१९ रोजी सुनावणीला आली. पूनर्विलोकन याचिका (Review Petition) आणि Memo of Appeal यामधील फरक याचिकाकर्त्यांना कळू नये याबद्दल न्यायालयाने आश्चर्य व्यक्त केले. पूनर्विलोकन याचिकेच्या नावाखाली Appeal Memo दाखल करणे हे अनुचित आहे, असे नमूद करून शासनाची पूनर्विलोकन याचिका फेटाळून लावली. ती पुढील शब्दात :-

**"2. The Review Petition is nothing but a Memo of Appeal.** All the paragraphs and the grounds therein denote that the order of this Court is stated to be passed on incorrect factual assumptions and this Court has not appreciated the powers of the Grievance Redressal Committee. If the grounds (a) to (e) are perused together with the preceding and following substantive paragraphs, it is evident **that this is not a Petition which can be entertained within the limited parameters of Review.** The review jurisdiction is not to be equated with Appeal or Revision. In Appeal whole judgment and order is open for scrutiny and verification on facts and law. In review it is not so. If we entertain this Review Petition we have to reconsider the matter in its entirety. **That is impermissible in review jurisdiction.** Though we condone the delay in filing the Review Petition, **we find no merits in the same. It is accordingly dismissed."**

**३५. शासनाने नेमलेल्या समितीमध्ये एकमताने "७१ दिवसाचे रोखलेले वेतन देण्यात यावे" असा निर्णय करणाऱ्या अधिकाऱ्यांनीच मा. सर्वोच्च न्यायालयात "ते देण्यात येऊ नये" म्हणून विशेष अनुमती याचिका दाखल केली. त्यातील भोंगळपणाच्या अनेक बाबी नमूद करण्यासारख्या आहेत.** स्थलाअभावी तसे करता येत नाही, पण एका बाबीचा उल्लेख अवश्य केला पाहिजे.

मा.उच्च शिक्षण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीची बैठक दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी झाली. या समितीच्या बैठकीत "काम नाही, वेतन नाही हे तत्त्व या ठिकाणी लागू होत नाही कारण त्या शिक्षकांनी आपले काम पार पाडलेले आहे," असा एकमताने निर्णय घेण्यात आला. या समितीमध्ये वित्त विभागाचे सचिव श्री. राजीव कु. मित्तल हे एक सदस्य होते. ते समितीच्या बैठकीला उपस्थित होते. तशी समितीच्या अधिकृत कार्यवृत्तामध्ये नोंद आहे. हे कार्यवृत्त मा.सर्वोच्च न्यायालयात सादर झाले आहे. समितीचा एकमताने निर्णय झाल्यानंतर तत्कालीन उच्च शिक्षण मंत्र्यांनी याबाबतचे निदेश पारित केले. असे असतांना श्री.राजीव कु. मित्तल यांची त्या निर्णयाच्या विरोधात तयार करण्यात आलेली टिपणी सर्वोच्च न्यायालयामध्ये सादर करण्यात आली. वित्त विभागाच्या सचिव पदावर काम करणाऱ्या एका ज्येष्ठ अधिकाऱ्याने समितीच्या बैठकीला उपस्थित राहून मंत्रिमहोदयांच्या अध्यक्षतेखाली **त्या बैठकीमध्ये एकमताने "नो वर्क नो पे हा निर्णय येथे लागू पडत नाही" असा निर्णय करावयाचा व नेमके त्याविरुद्ध "नो वर्क नो पे या तत्वानुसारच निर्णय करावा लागेल, उच्च शिक्षण विभागाचा प्रस्ताव मान्य करता येत नाही" असे मत मांडणारी टिपणी उच्च शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल करावयाची,**

***''वित्त विभाग आणि विधी व न्याय विभाग सर्वोच्च न्यायालयापेक्षा मोठा नाही. उच्च व तंत्रशिक्षण विभागाला सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय बंधनकारक आहे. हे महाराष्ट्रातील शिक्षण खाते आहे. हे पाकिस्तान किंवा बांगलादेशातील शिक्षण खाते नाही.''***

*(लेखाचा परिच्छेद ४६ पहा)*

**हे कृत्य प्रशासनाचा अत्यंत क्षुद्र दर्जा दर्शविणारे आहे.** हा प्रकार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आल्याशिवाय राहीला नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाने उच्च शिक्षण विभागाची विशेष अनुमती याचिका दिनांक ७ फेब्रुवारी २०२० रोजी (SLP (Civil) Diary No. 1076/2020) फेटाळून लावली. इतकेच नव्हे तर भारतीय घटनेच्या कलम १३६ अंतर्गत विशेष अनुमती देण्याच्या लायकीचे हे प्रकरण नाही, असेही मा.सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालात नमूद केले. ते पुढील शब्दात :-"Delay condoned. We are not inclined to entertain the Special Leave Petition under Article 136 of the Constitution of India.The Special Leave Petition is accordingly **DISMISSED."** *(P14NB2020)*

***** ***** *****

**३६.** न झालेल्या संपाला "संप-आंदोलन" संबोधून बेकायदेशीरपणे ७१ दिवसांचे वेतन कापून घेण्याचा निर्णय मा.उच्च न्यायालयाने रद्दबातल ठरविला. तीन महिन्यांच्या आत हे वेतन अदा करण्यात यावे, असे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिनांक २३ जानेवारी २०१९ रोजी पारित केले. मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला मा.सर्वोच्च न्यायालयाने कधीही स्थगनादेश दिलेला नव्हता. इतकेच नव्हे तर याबाबतीत सर्वोच्च न्यायालयामध्ये करण्यात आलेली राज्यशासनाची विशेष अनुमती याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २ मार्च २०२० रोजी फेटाळून लावली होती. **दिनांक २३ जानेवारी २०१९ रोजी मा. उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर भारतीय संविधानातील तरतुदींप्रमाणे उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी जी कारवाई करायला पाहिजे होती, ती त्यांनी आजतागायत केली नाही व संविधानातील तरतुदींचा सतत भंग केला, ही बाब मी सबळ पुराव्यानिशी नमूद करू इच्छितो.**

**३७.** मा. उच्च न्यायालयाने एकदा निर्णय दिल्यानंतर (त्याला मा.सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली नसेल तर) त्याची अंमलबजावणी करणे संविधानातील तरतुदींप्रमाणे शासनावर बंधनकारक असते. भारतीय संविधानातील खंड २०२ (३) (e) प्रमाणे या न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी येणारा खर्च हा राज्याच्या संचित/एकत्रित निधीवरील प्रभारित खर्च (charged expenditure) असतो. याबाबतच्या संविधानातील सर्व तरतुदी मी मा.उच्च शिक्षणमंत्र्यांना दिनांक ९ मार्च २०२० रोजी सादर केलेल्या (२५ परिच्छेदांच्या) एका तपशीलवार टिपणाद्वारे लक्षात आणून दिलेल्या आहेत. त्या टिपणातील सहावा परिच्छेद पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्याकडे सर्व मार्गांनी येणारे उत्पन्न राज्याच्या संचित (एकत्रित) निधीमध्येच जमा करावे लागेल अशी तरतूद घटनेच्या खंड २६६ मध्ये आहे. विधानमंडळाने कायदा करून मान्यता दिल्यावरच व दिल्या प्रमाणे शासनाला संचित निधीतून खर्च करता येईल. (खंड २६६ (३)) असा कायदा करण्याच्या प्रयोजनार्थ "वार्षिक वित्तीय विवरणपत्र" सभागृहाला सादर करावे लागेल. (खंड २०२) या विवरणपत्रामध्ये भारित खर्च (charged expenditure) अमतदेय भाग म्हणून वेगळा दाखवावा लागेल. इतर खर्च (other expenditure) हा वेगळा मतदेय भाग (votable part) म्हणून दाखवावा लागेल. (खंड २०२ (२)) अमतदेय भागात समाविष्ट असलेल्या खर्चावर चर्चा होऊ शकेल, मतदान करता येणार नाही. (खंड २०३ (१)) हा भाग मतदानाशिवाय मंजूर करावयाचा भाग असेल. इतक्या स्पष्ट तरतुदी भारतीय संविधानात समाविष्ट आहेत."

**३८.** घटनेतील ह्या तरतुदींचे काळजीपूर्वक अवलोकन केले तर असे दिसून येते की, मा. उच्च न्यायालयाचा दिनांक २३ जानेवारी २०१९ रोजी निर्णय झाल्यानंतर त्यातून उद्‌भवणाऱ्या खर्चाच्या रकमा वार्षिक वित्तीय विवरणपत्रामध्ये अमतदेय (non-votable part) भाग म्हणून समाविष्ट करण्याचे कर्तव्य या अधिकाऱ्यांनी पार पाडले नाही. पुराव्यासह व उदाहरणास पुढीलप्रमाणे :-.

### *सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १*

**३९.** दिनांक ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी व प्रयोजनांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी तयार करण्यात आलेला **महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन अधिनियम २०१९** म्हणजेच **सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १** मा. राज्यपालांच्या संमतीनंतर शुक्रवार, **दिनांक ८ मार्च २०१९** रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार मध्ये प्रकाशित करण्यात आला. २३ जानेवारी २०१९ रोजी उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला असल्यामुळे व त्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली नसल्यामुळे त्या निर्णयातून उद्‌भवणाऱ्या खर्चाला विधानमंडळाची मान्यता घेण्यासाठी विनियोजन विधेयकामध्ये अमतदेय भागात हा खर्च समाविष्ट करणारा प्रस्ताव सादर करण्याची जबाबदारी ही उच्च शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांची होती. पण ती जबाबदारी त्यांनी पार पाडली नाही असे स्पष्टपणे दिसून येते. सन २०१९ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ अन्वये **चार हजार दोनशे चौऱ्याऐंशी कोटी पासष्ट लाख छत्तीस हजार रूपये** खर्च करण्यासाठी परवानगी देणाऱ्या **या कायद्यामध्ये उच्च शिक्षण विभागाने संचितनिधीवर भारीत खर्च म्हणून करावयाच्या मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयातून उद्‌भवणाऱ्या खर्चाच्या रकमेचा प्रस्ताव न देण्याचे कृत्य हे घटनात्मक कर्तव्याचे पालन न करण्याचे कृत्य होय.**

### *सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २*

**४०.** राज्याच्या एकत्रित निधीतून २०१९-२०२० या वित्तीय वर्षाच्या काही भागातील कामांकरिता व प्रयोजनांसाठी विवक्षित रकमा काढून घेण्यासाठी तरतूद करणारा **महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) अधिनियम २०१९** म्हणजेच सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, हा मा.राज्यपालांच्या संमतीनंतर **दिनांक ८ मार्च २०१९** रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्राच्या असाधारण भाग चार मध्ये प्रकाशित करण्यात आला. **एक लक्ष सत्तेचाळीस हजार सहाशे पस्तीस कोटी, बत्तीस लक्ष त्र्याहत्तर हजार रुपये** एवढ्या एकूण खर्चाला विधानमंडळाने या कायद्यान्वये मान्यता दिलेली आहे. यामध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे मतदेय भागामध्ये १४,९१,७०,००० इतक्या रूपयांची मागणी समाविष्ट करण्यात आली. मात्र अमतदेय भागामध्ये एक रूपयाचा सुद्धा प्रस्ताव उच्च शिक्षण विभागातर्फे सादर करण्यात आलेला नाही असे स्पष्टपणे दिसून येते. **मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयातून उद्‌भवणाऱ्या खर्चाच्या रकमेचा प्रस्ताव अमतदेय भाग म्हणून सादर न करण्याचे कृत्य म्हणजे घटनात्मक कर्तव्याचे पालन न करण्याचे अपकृत्य होय. असे अपकृत्य उच्च शिक्षणविभागातील अधिकाऱ्यांच्या हातून दुसऱ्यांदा घडले होते.**

### *सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९*

**४१.** दिनांक ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी व प्रयोजनांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यासाठी करण्यात आलेला **महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन अधिनियम, २०१९** म्हणजे सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ होय. या अधिनियमान्वये **चोवीस हजार सातशे सत्त्याहत्तर कोटी एकोणपन्नास लाख चौसष्ट हजार रुपये** एवढ्या खर्चाला महाराष्ट्र राज्याच्या विधानमंडळाने मान्यता दिली. मतदेय भागामध्ये १,१३,६८,१६,००० एवढ्या रकमेचा प्रस्ताव उच्च शिक्षण विभागाने प्रस्तावित केला होता व त्या खर्चाला विधानमंडळाची मान्यता मिळाली. उच्च शिक्षण विभागाने सादर केलेल्या २,४६,३४,००० रुपये एकत्रित निधीवर भारीत असलेल्या खर्चाचा अमतदेय मागणीमध्ये उच्च शिक्षण विभागाने समावेश केला होता. घटनेतील तरतुदीप्रमाणे मतदान न करता विधानमंडळाला अशा मागण्या मान्य कराव्या लागतात. मा.उच्च न्यायालयाचा निर्णय हा २३ जानेवारी २०१९ रोजी लागलेला होता व तेथून जवळ जवळ सहा-सात महिन्यांनी **दिनांक ८ जुलै २०१९** रोजीच्या राजपत्रामध्ये हा अधिनियम प्रसृत करण्यात आला. मा. उच्च न्यायालयाच्या त्या निर्णयातून उद्‌भवणाऱ्या खर्चाच्या रक्कमा या अधिनियमात समाविष्ट करण्यात आलेल्या नाहीत. मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयातून उद्‌भवणाऱ्या खर्चाच्या रकमेचा प्रस्ताव अमतदेय भाग म्हणून सादर न करण्याचे कृत्य म्हणजे घटनात्मक कर्तव्याचे पालन न करण्याचे अपकृत्य होय. **असे अपकृत्य उच्च शिक्षणविभागातील अधिकाऱ्यांच्या हातून तिसऱ्यांदा घडले होते.**

### *सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५*

**४२.** दिनांक ३१ मार्च २०२१ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या सेवांसाठी व प्रयोजनांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे या प्रयोजनार्थ करण्यात आलेला **महाराष्ट्र विनियोजन अधिनियम, २०२०** हा **दिनांक १८ मार्च २०२०** रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्राच्या असाधारण

भाग चार मध्ये प्रकाशित करण्यात आला आहे. राज्याच्या एकत्रित निधीतून **चार लाख पन्नास हजार सहाशे छत्तीस कोटी, एकोणसत्तर लाख, अठरा हजार रुपये** खर्च करण्यासाठी या अधिनियमान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. उच्च शिक्षण विभागाने सादर केलेल्या व मान्य झालेल्या एकूण १,०९,६७,८३,०७,००० एवढ्या रुपयाच्या प्रस्तावाला या कायद्याने मान्यता प्रदान केलेली आहे व **त्यामध्ये ३,९७,३१,४५,००० एवढ्या रकमेचा एकत्रित निधीवरील प्रभारीत खर्चाचा अमतदेय प्रस्ताव सुद्धा विधानमंडळाने मान्य केलेला आहे. घटनेतील तरतुदीप्रमाणे तसा तो करावाच लागतो.** मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयातून उद्‌भवणारा खर्च अमतदेय भागामध्ये समाविष्ट करण्याचे कर्तव्य उच्च शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी इतक्या उशीरानेसुद्धा पार पाडले नाही असे दिसून येते. **घटनात्मक कर्तव्याचे पालन न करण्याचे असे अपकृत्य उच्च शिक्षणविभागातील अधिकाऱ्यांच्या हातून चौथ्यांदा घडले होते.**

**४३.** भारतीय घटनेच्या कलम २१५ अन्वये उच्च न्यायालयाला अभिलेख न्यायालयाचा दर्जा दिलेला असून या न्यायालयाच्या निर्णयाचे पालन न केल्याबद्दल तसे करणाऱ्यास शिक्षा करण्याची शक्तीसुद्धा याच कलमान्वये मा.उच्च न्यायालयाला प्रदान केलेली आहे. याशिवाय न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करतांना होणाऱ्या खर्चाच्या रकमा उपलब्ध करून घेण्यास शासकीय अधिकाऱ्यांना अडचण जाऊ नये म्हणून भारतीय घटनेच्या कलम २०२ (३) (e) अन्वये हा खर्च राज्याच्या संचित/एकत्रित निधीवरील (Consolidated Fund of State) प्रभारित खर्च म्हणून घटनेत नमूद करण्यात आलेला आहे. असा खर्च वार्षिक वित्तीय विवरणपत्रामध्ये अमतदेय भाग (non-votable part) म्हणून सादर करावा लागतो व विधानमंडळाला तो मतदानाशिवाय मंजूर करावा लागतो, अशी ही तरतूद घटनेमध्ये करून ठेवण्यात आलेली आहे. **मा. उच्च न्यायालयाने दिनांक २३ जानेवारी २०१९ रोजी दिलेल्या निर्णयाची (ज्यावर सर्वोच्च न्यायालयाने कधीही स्थगिती दिलेली नाही) अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या रकमांचा समावेश अनेक संधी मिळूनसुद्धा वार्षिक वित्तीय विवरणपत्रामध्ये अमतदेय भाग म्हणून दाखल करण्याच्या कर्तव्यात ज्या अधिकाऱ्यांनी कसूर केली ते अधिकारी घटनेतील या तरतुदींचा सतत, लागोपाठ व वारंवार भंग करण्याचे अपराधी आहेत.** याबाबतची चौकशी होऊन कोण अधिकारी या अपकृत्त्यास जबाबदार आहेत, हेसुद्धा निश्चित होणार नसेल तर उच्च शिक्षण विभागात सुरू असलेले हे घोर अराजक यापुढेही असेच चालू राहणार, ही गोष्ट निर्विवाद होय.

**४४.** उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत भारतीय घटनेतील ज्या तरतुदी मी वर विशद केलेल्या आहेत, त्याची जाणीव प्रशासनातील सर्वोच्च पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना निश्चितपणे आहे व होती. घटनेतील ह्या तरतुदी अस्तित्वात असल्याची जाणीव असल्यामुळे व घटनाभंगाचा

*(सहपत्र : एक परिच्छेद ४ पहा)*

**F. No.1-7/2019-U.II**

# GOVERNMENT OF INDIA

## Ministry of Human Resource Development
## Department of Higher Education

University-II Section

**New Delhi, dated 26th September, 2019**

To,
The Principal Accounts Officer,
Department of Higher Education,
Ministry of Human Resource Development,
Shastri Bhawan, New Delhi.

**Subject:** Reimbursement of central share for implementation of the scheme of revision of pay scales (7th CPC) of university and college teachers to the Govt. of Maharashtra-reg.

Sir,

I am directed to say that the Government of India had revised pay of teachers and other equivalent cadres in university and college based on the recommendations of the 7th Central Pay Commission (7th CPC), vide this Department's letter No.1-7/2015-U.II(1)dated 2nd November, 2017 and 8th November, 2017. **The Central Government had decided to provide financial assistance to State Governments opting to revise pay scales of teachers and other equivalent cadre, as per above said letters of this Department, by way of reimbursement, to the extent of 50% (fifty percent) of the additional expenditure involved in the implementation of the pay revision, for the universities, colleges and other higher educational institutions funded by the State Government, for the period from 01.01.2016 to 31.03.2019, subject to fulfillment of prescribed terms and conditions.** The guidelines for reimbursement of financial burden due to implementation of revised pay scales on the basis of 7th Pay Commission recommendations for teachers and equivalent cadres in Universities and Colleges from 01.01.2016, had been forwarded to all State Govemments, vide letter No.1-1/2018-U.II dated 26th July, 2018 and 11th September, 2018, for information and necessary action.

2. The Govt. of Maharashtra has decided to implement the scheme of revision of pay (7th CPC) for teachers and other equivalent cadres in universities/ colleges in the State and has submitted a copy of the orders issued by the State Govt. in this regard to the Central Government. The orders issued by the State Govt. in this behalf have been examined and found to be in conformrty with the relevant corresponding stipulations in this Department's scheme in view of this, it has been decided to release an amount of **Rs.1320,93,04,503/- (Rupees Thirteen Hundred Twenty Crore Ninety Three Lakh Four Thousand Five Hundred Three only)** against total Central Share i.e Rs.1320,93,04,503/- (50% of total additaonality i.e Rs.2641,86,09,006/-) to Maharashtra as first (1st) and final installment on 'on account' basis implementation of the above Scheme in the State.

3. The sanction of the President is hereby accorded to the payment of **Rs.1320,93,04,503/- (Rupees Thirteen Hundred Twenty Crore Ninety Three Lakh Four Thousand Five Hundred Three only)** to State Government of Maharashtra to enable it to meet additional expenditure involved in implementation of the Scheme during the period from 01.01.2016 to 31.03.2019. This amount would be utilized by the State Govt. in accordance with the terms and conditions stipulated in this Department's letter referred to above.

4. The grant will be further subject to the following terms and conditions :-

a) Financial assistance from the Central Government to State Govemments opting to revise pay scales of teachers and other equivalent cadre covered under the Scheme shall be limited, by way of reimbursement, to the extent of 50% (fifty percent) of the additional expenditure involved in the implementation of the pay revision, for the universities, colleges and other higher educational institutions funded by the State Govemment.

b) The State Government opting for revision of pay shall meet the remaining 50% (fifty percent) of the additional expenditure from its own sources.

**c) The proposal for reimbursement on account of pay revision in State funded universities, colleges and other higher educational institutions shall be submitted in the prescribed format by the State Governments.** The state bills preferred by the State Governments for reimbursement pertaining to 2017-18 and 2018-19 would be met to the extent of 50% of additional financial impact during these two years. There would be no central assistance thereafter.

d) Financial assistance referred to in sub-clause (a) above shall be provided for the period from 01.01.2016 to 31.03.2019.

e) The entire liability accruing with effect from

अपराध आपल्या हातून घडू नये म्हणून घटनेतील उपरोक्त तरतुदींचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्याच्या **मुख्य सचिवांनी, विधी व न्याय विभागाच्या सचिवांनी, वित्त विभागाच्या सचिवांनी व उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सचिवांनी यापूर्वीच याबाबतीत घटनात्मक तरतुदींशी सुसंगत असे यथोचित आदेश निर्गमित केलेले आहेत.** राज्याच्या मा.शिक्षणमंत्र्यांना दिनांक ९ मार्च २०२० रोजी सादर केलेल्या २५ परिच्छेदांच्या टिपणामध्ये याबाबतचे आदेश मी लक्षात आणून दिले आहेत. त्या २५ परिच्छेदांच्या टिपणातील परिच्छेद ८, ९ व १० मी सत्वर संदर्भासाठी पुन्हा उधृत करू इच्छितो. ते पुढीलप्रमाणे :-

***''विधी व न्याय विभागाचे आदेश***

८. मा. सर्वोच्च न्यायालय तर सोडाच पण मा.उच्च न्यायालयाने आदेश पारित केल्यानंतर त्यासाठी कोणताही वेगळा शासननिर्णय वगैरे निघण्याची वाट न पाहता किंवा कोणाचाही सल्ला वगैरे न घेता त्याची अंमलबजावणी ताबडतोबीने करावी असे आदेश वारंवार शासनातर्फे देण्यात आलेले आहेत. दिनांक २ एप्रिल २०१४ रोजी विधी व न्याय विभागाने "Action to be taken when the decision of High Court is adverse to the State and is not stayed by Hon'ble the Supreme Court of India" या विषयावर काढलेल्या परिपत्रकामध्ये (No.: 820-2014/Misc./E Branch) असे नमूद केले आहे की, :-

"2. If the appeal/SLP is filed by the State against the order of the Hon'ble the High Court, but no stay is granted to the implementation and enforcement of the order of the Hon'ble the High Court, **such orders would have to be implemented failing which the concerned officer/department may face the action for contempt of Court.** The order against which no stay has been granted will have to be complied with/implemented subject to the final decision of the Hon'ble the Supreme Court." *(P101NB2014)*

***वित्त विभागाचे आदेश***

९. विधी व न्याय विभागाच्या परिपत्रकानंतर २० ऑक्टोबर २०१४ रोजी वित्त विभागाने **"न्यायालयीन प्रकरणे त्वरित निकाली काढणे व अवमान याचिकेसंदर्भात"** या मथळ्याचे एक परिपत्रक (क्रमांक न्यायप्र २०१४/प्र.क्र. ८९६/प्रशा १) निर्गमित केले असून त्या परिपत्रकामध्ये स्पष्टपणे असे नमूद केले आहे की, :-

"या संदर्भात सर्व विभागांना अशा सूचना देण्यात येत आहेत की, अशा न्यायालयीन प्रकरणात वित्त विभागाने मांडलेली भूमिका / निर्णय संबधित विभागाने तातडीने याचिकाकर्त्यांना न्यायालयाने ठरवून दिलेल्या वेळेत कळवावा.

---

01.04.2019 onwards on account of revision of pay scales etc. of university and college teachers shall be met by the State Government/University opting for revision of pay scales.

f) The financial assistance from the Central Government shall be restricted to revision of pay scales in respect of only those posts which were in existence and filled up on regular basis as on 01.01.2016 by way of reimbursement.

(g) State Governments, taking into consideration other local conditions, may also decide in their discretion, to introduce pay higher than those mentioned in this Scheme, and shall give effect to the revised bands/ scales of pay from 01.01.2016; however, in such cases, the details of modifications proposed shall be furnished to the Central Government and Central assistance shall be restricted to the Pay as approved by the Central Govemment and not to any higher pay tixed by the State Government(s).

**h) Payment of Central assistance for implementing this Scheme is also subject to the condition that the entire Scheme of revision of pay scales, together with all the conditions to be laid down by the UGC by way of Regulations and other guidelines shall be implemented by State Governments and Universities and Colleges coming under their jurisdiction as a composite scheme without any modification except in regard to the date of implementation and pay scales mentioned herein above.**

**5. The grant is further subject to the terms and conditions stipulated in this Ministry's letter No.1-7/2015-U.II(1) dated 2nd November, 2017 & 8th November, 2017 and subsequent instructions/ clarifications, if any, issued from time to time and UGC's Notification dated 18th July, 2018.**

6. The accounts of all grantee Institutions or Organisations shall be open to inspection by the sanctioning authority and audit, both by the Comptroller and Auditor General of India under the provision of CAG(DPC) Act 1971 and internal audit by the Principal Accounts Office of the Ministry or Department, whenever the Institution or Organisation is called upon to do so and a provision to this effect should invariably be incorporated in all orders sanctioning grants-in-aid as mentioned in Rule 211(1) of GFR-2005.

7. The amount is debitable to the following three Heads of Demand No.58-Department of Higher Education:

i. **Rs.964,27,92,288/- (General)** from : Major Head 3601 Grants-in-aid to State Government, 08-Other transfer/grants to States 111-Special Assistance, 08-Improvement in pay scales of university and college teachers, 00, 36-Grants-in-aid salaries, of the financial year 2019-20.

ii. **Rs.237,76,74,810/- (SC)** from: Major Head 3601 Grants-in-aid to State Govemment, 08-Other transfer/ grants to States 789-Special Component Plan for Scheduled Castes, 01-Improvement in pay scales of university and college teachers, 00, 36-Grants-in-aid salaries, of the financial year 2O19-20.

iii. **Rs.118,88,37,405/- (ST)** from: Major Head 3601 Grants-in-aid to State Government, 08-Other transfer/ grants to States 796-Tribal Area Sub Plan, 01-Improvement in pay scales of university and college teachers, 00, 36-Grants-in-aid salaries, of the financial year 2019-20.

8. The expenditure of **Rs.118,88,37,405/- (Rupees One Hundred Eighteen Crore Eighty Eight Lakh Thirty Seven Thousand Four Hundred Five only)** will be debited to Demand No.58-Departmenl Higher Education from: Major Head 3601 Grants-in-aid to State Government, 08-Other transfer/grants to States 796-Tribal Area Sub Plan, 01-Improvement in pay scales of university and college teachers, 00, 36-Grants-in-aid salaries, of the financial year 2019-20.

9. The pattern of assistance has been approved by the Ministry of Finance. This sanction is being issued in conformity with the rules and principles of the scheme as approved by the Ministry of Finance, and under the powers delegated to this Ministry in consultation with **the Integrated Finance Division vide their Dy. No.2558/Integrated Finance Division/2019, dated 25th September, 2019 and funds certified by Internal Finance Branch vide their Dy. No.589/2019-IF.I dated 26th September, 2019.**

10. Principal Accounts Office is requested to issue necessary Advice to Reserve Bank of India, Central Accounts Section, Nagpur immediately for crediting the above amount to Maharashtra Govt's account, under intimation to the undersigned.

Yours faithfully
(Sanjeev Kumar Narayan)
Under Secretary to the Govt. of India

Copy to

1. The Secretary, Higher and Technical Education Department, Govt. of Maharashtra, 411, Mantralaya Annexe, Hutatma Rajguru Chowk, Mumbai - 400 032. It may kindly be noted that implementation of the Scheme of revision of pay scales for teachers and other equivalent cadres in universities/colleges in Maharashtra shall be subject to the conditions stipulated in Para 4 and 5 of this sanction letter as well as those laid down in the guidelines/ regulations/orders that may be issued by the Government of India/UGC in this behalf from time to time.

2. The Secretary, Finance Department, Government of Maharashtra, 299, Palm Beach Rd, Juhu Nagar, Phase 2, Sector 19D, Vashi, Navi Mumbai, Maharashtra 400703.

3. IF-I Section.

4. Guard File.

(Sanjeev Kumar Narayan)
Under Secretary to the Govt. of India

**तसेच न्यायालयाने विशिष्ट मुदत घालून दिलेल्या प्रकरणांमध्ये मुदतीपूर्वीच यथोचित कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी, जेणेकरून अकारण अवमान याचिका दाखल होणार नाहीत."** (P12NB2015)

### *मा. मुख्य सचिवांचे आदेश*

१०. **"न्यायालयीन प्रकरणे त्वरित निकाली काढण्याबाबत"** या विषयावर राज्याच्या मुख्य सचिवांच्या स्वाक्षरीने पुन्हा २८ ऑक्टोबर २०१४ रोजी वित्त विभागाने आणखी एक परिपत्रक काढले असून त्या परिपत्रकात पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे. :-

"**परिपत्रक** : उपरोक्त दिनांक २० ऑक्टोंबर,२०१४ च्या परिपत्रकान्वये न्यायालयीन प्रकरणात वित्त विभागाने मांडलेली भूमिका/निर्णय संबधित विभागाने तातडीने याचिकाकर्त्यांना न्यायालयाने ठरवून दिलेल्या वेळेत कळविण्याबाबत तसेच अवमान याचिकेसंदर्भात न्यायालयाने विशिष्ट मुदत घालून दिलेल्या प्रकरणांमध्ये मुदतीपूर्वीच यथोचित कार्यवाही करण्याची दक्षता घेण्याबाबतच्या सूचना सर्व प्रशासकीय विभागांना देण्यात आलेल्या आहेत. त्यास अनुसरुन सर्व प्रशासकीय विभागांना अशा सूचना देण्यात येत आहेत की, विभागांनी आपल्या अधिनस्त सर्व न्यायालयीन प्रकरणांचा वेळोवेळी आढावा घेऊन **न्यायालयीन प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. एखादे न्यायालयीन प्रकरण कार्यवाहीविना प्रलंबित राहिल्यास संबंधित कार्यासनाच्या कक्ष अधिकारी यांना त्याबाबत व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येईल."** (P13NB2015)

४५. विधी व न्याय विभागाने २ एप्रिल २०१४ रोजी परिपत्रक काढले, वित्त विभागाने याबाबतीत प्रथम २० ऑक्टोबर २०१४ रोजी परिपत्रक काढले. त्यानंतर वित्त विभागाने दिनांक २८ ऑक्टोबर २०१४ रोजी मुख्य सचिवांच्या सहीने आणखी पुन्हा एक परिपत्रक काढले. त्यानंतर ११ नोव्हेंबर २०१४ रोजी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सचिवांनी सुद्धा याबाबतीत एक परिपत्रक (क्र.न्यायप्र २०१४/प्र.क्र.४७४/१४/वि.शि.-१) काढले व तत्सम आदेश निर्गमित केले. (P2NB2015) **सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय तर दूरच राहिला पण उच्च न्यायालयाच्या निर्णयावरसुद्धा स्थगनादेश मिळाला नसेल तर त्याची अंमलबजावणी करणे हे बंधनकारक आहे व ते घटनात्मक बंधन आहे. याची स्पष्ट जाणीव करून देणारे आदेश मुख्य सचिव, विधी व न्याय विभागाचे सचिव, वित्त विभागाचे सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सचिव यांनी दिलेले असतांना या सर्व आदेशांचा भंग करणारे कोण अधिकारी उच्च शिक्षण विभागात बसलेले आहेत?** याची चौकशी होऊन जबाबदारी निश्चित केली जाणार नसेल तर शासनाच्या उच्च शिक्षण विभाग या नावाच्या बेटावरील हे अराजक असेच चालू राहील.

**भारतीय घटनेतील तरतुदी, मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय अंमलात आणण्याविषयीच्या कायदेशीर तरतुदी व असे निर्णय अंमलात आणण्याच्या बाबतीत खुद्द महाराष्ट्र शासनातील सर्वोच्च अधिकाऱ्यांनी दिलेले आदेश यांची आपण बिनदिक्कतपणे मोडतोड करू शकतो, असे प्रदर्शित करणारे उच्च शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांचे उद्दाम वर्तन उच्च शिक्षण विभागाला लाजेने मान खाली घालायला लावणारे आहे.**

*****   *****   *****

४६. मा. उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांची अंमलबजावणी करतांना अनेक महिन्यांचा विलंब लावून त्या निर्णयांकडे दुर्लक्ष करण्याची ही वृत्ती भारताच्या घटनेतील तरतुदींचा सरळ सरळ भंग करणारी आहे, याबद्दल उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना कवडीइतकाही संकोच वाटत नाही. उच्च शिक्षण विभागाची ही वृत्ती लक्षात घेऊन दिनांक ५ मार्च २०२० रोजी विधानपरिषदेमध्ये झालेल्या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी असे उद्‌गार काढले की, "सर्वोच्च न्यायालयाने राज्यशासनाची पूनर्विलोकन याचिका फेटाळली आणि खालच्या न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला. **आपला**

*(सहपत्र : दोन परिच्छेद ५३, ६० व ६२.२ पहा)*

### *मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाने नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल अशा आदेशांच्या आतापर्यंत दिलेल्या निर्णयांचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत*

### As on 15.08.2020

**(1)** In the High Court of Judicature at Bombay : Civil Appellate Jurisdiction : Writ Petition No. 13166 of 2017 Shri Maruti Dattatraya Patil..Petitioner Vs. The State of Maharashtra and ors...Respondents. **Date of Judgment : 03rd October, 2018** *(Full Text of the Judgment is printed on page 120 of 2018 NUTA Bulletin.)*

**(2)** In the High Court of Judicature at Bombay : Civil Appellate Jurisdiction : Writ Petition No.1219 of 2017 Rekha Naresh Pulekar ..Petitioner Versus Shree Shiv Shahu Mahavidyalay, Sharud, Taluka Shahuwadi, District Kolhapur and others ..Respondents. **Date of Judgment : 19th October, 2018** *(Full Text of the Judgment is printed on page 137 of 2018 NUTA Bulletin.)*

**(3)** In the High Court of Judicature at Bombay : Bench at Aurangabad : Writ Petition No. 1304 of 2016 Sharda Rajendra Aajbe..Petitioner Versus State of Maharashtra and Others..Respondents. **Date of Judgment :12th December, 2018** *(Full Text of the Judgment is printed on page 25 of 2019 NUTA Bulletin.)*

**(4)** In the High Court of Judicature at Bombay : Civil Appellate Jurisdiction : Writ Petition No. 755 of 2019 Ranpise Vijaykumar Baburao...Petitioner V/S. The State of Maharashtra & ors.Respondents. **Date of Judgment : 9th April 2019.** *(Full Text of the Judgment is printed on page 103 of 2019 NUTA Bulletin.)*

**(5)** In the High Court of Judicature at Bombay : Bench at Aurangabad : Writ Petition No. 3293 of 2019 Shankar Bhagwanrao Deshmukh..Petitioner Versus The State of Maharashtra and Others..Respondents. **Date of Judgment :18/06/2019** *(Full Text of the Judgment is printed on page 16 of 2020 NUTA Bulletin.)*

**(6)** In the High Court of Judicature at Bombay : Bench at Nagpur : Writ Petition No. 2068 of 2019 Rajesh Vasantrao Pande..Petitioner Versus State of Maharashtra and Others..Respondents. **Date of Judgment : 29th July 2019.** *(Full Text of the Judgment is printed on page 134 of 2019 NUTA Bulletin.)*

**(7)** In the High Court of Judicature at Bombay : Bench at Aurangabad : Writ Petition No. 11316 of 2015 Bhanudas Vithalrao Kale...Petitioner V/S. The State of Maharashtra & ors.Respondents. **Date of Judgment : 28th August 2019.** *(Full Text of the Judgment is printed on page 02 of 2020 NUTA Bulletin.)*

**(8)** In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench, Nagpur : Writ Petition No.7375 of 2019 : Petitioner : Sunil Pundlikrao Joshi Versus Respondents : (1) State of Maharashtra **Date of Judgment :** 9th July, 2020 *(Full Text of the Judgment is printed on page 86 of 2020 NUTA Bulletin.)*

**(9)** In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench, Nagpur : Writ Petition No.7395 of 2019 : Petitioner : Sau. Vibha Ninad Saoji alias Ku. Vibha Laxman Umalkar, Versus Respondents : (1) State of Maharashtra, **Date of Judgment :** 9th July, 2020. *(Full Text of the Judgment is printed on page 87 of 2020 NUTA Bulletin.)*

*****

**(1) Supreme Court of India :** Record of Proceedings : Special Leave Petition (Civil) Diary No(s).14703/2019 (Arising out of impugned final judgment and order dated 03-10-2018 in WP No. 13166/2017 passed by the High Court of Judicature at Bombay) The State of Maharashtra & Ors. Petitioner(s) Versus Maruti Dattatraya Patil & Ors. Respondent(s) **Date of Judgment : 01-07-2019** *(Full Text of record of proceedings is printed on page 117 of 2019 NUTA Bulletin.)*

**(2) Supreme Court of India :** Record of Proceedings : Special Leave Petition (Civil) Diary No(s).1076/2020 (Arising out of impugned final judgment and order dated 09-04-2019 in WP No. 755/2019 passed by the High Court of Judicature at Bombay) The State of Maharashtra & Ors. Petitioner(s) Versus Ranpise Vijaykumar Baburao & Ors. Respondent(s) **Date of Judgment : 07-02-2020** *(Full Text of record of proceedings is printed on page 14 of 2020 NUTA Bulletin.)*

**(3) Supreme Court of India :** Record of Proceedings : Special Leave Petition (Civil) Diary No(s).1309/2020 (Arising out of impugned final judgment and order dated 29-07-2019 in WP No. 2068/2019 passed by the High Court of Judicature at Bombay Bench At Nagpur) The State of Maharashtra & Anr. Petitioner(s) Versus Rajesh Vasantrao Pande & Anr. Respondent(s) **Date of Judgment : 17-02-2020** *(Full Text of record of proceedings is printed on page 15 of 2020 NUTA Bulletin.)*

*****

**महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागातील अधिकारी सर्वोच्च न्यायालयासमोर सुद्धा शपथपत्रावर धडधडीत असत्य माहिती दाखल करतात, हे केवळ आश्चर्यकारक नव्हे तर खेदजनक व लाजिरवाणे सुद्धा आहे.**

*(लेखाचा परिच्छेद ५७ पहा)*

**वित्त विभाग, विधी व न्याय विभाग आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग सर्वोच्च न्यायालयापेक्षा मोठा आहे काय? हे मंत्रिमहोदयांनी स्पष्ट करावे"** त्याच चर्चेमध्ये श्री. कपिल पाटील यांनी पुढे असेही उद्‌गार काढले की, **"वित्त विभाग आणि विधी व न्याय विभाग सर्वोच्च न्यायालयापेक्षा मोठा नाही. उच्च व तंत्रशिक्षण विभागाला सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय बंधनकारक आहे. हे महाराष्ट्रातील शिक्षण खाते आहे. हे पाकिस्तान किंवा बांगला देशातील शिक्षण खाते नाही."** श्री.कपिल पाटील यांनी सभागृहामध्ये हे जे उद्‌गार काढले त्यावेळेला "न केलेल्या संप आंदोलनाला संप संबोधून ७१ दिवसांचे वेतन बेकायदेशीरपणे कापून घेण्याचे प्रकरण" यावर सभागृहात चर्चा सुरू होती. त्याहीपेक्षा एक नमुनेदार प्रकरण या निमित्ताने मी मांडू इच्छितो. **उच्च न्यायालयाचे अनेक निर्णय सर्वोच्च न्यायालयामध्ये अनेक वेळेला कन्फर्म करण्यात आले तरीही अत्यंत दुष्ट हेतूने व भावी भ्रष्टाचाराची संभाव्य आवर्तने काढण्याची सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून उच्च शिक्षण विभागातील अधिकारी न्यायिक निर्णयाच्या विरोधात सतत कारवाई करण्यात गुंतलेले आहे.** याचे उघडउघडपणे दर्शन घडविणारे हे प्रकरण आहे.

**४७.** सदरहू प्रकरण हे नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू राहणे याबाबतचे आहे. दिनांक २७ जून २०१३ रोजी उच्च शिक्षण विभागाने एक शासननिर्णय निर्गमित केला व २३.१०.१९९२ ते ०३.०४.२००० या कालखंडात नेमणूक केलेल्या नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या सेवा नियमित करण्याबाबत शासननिर्णय निर्गमित केला. या शासननिर्णयाच्या परिच्छेद १५ मध्ये पुढीलप्रमाणे शब्दरचना होती :-

"१५. दिनांक २३.१०.१९९२ ते दिनांक ३.४.२००० या कालावधीतील ज्या बिगर नेट/सेट अध्यापकांनी त्यांच्या सेवाकालावधीत विद्यापीठ अनुदान आयोगाने अधिव्याख्याता पदासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता/पात्रता (नेट/सेट/पीएच.डी/एम.फील) प्राप्त केली नाही. अशा अध्यापकांना खालील अटींच्या अधीन राहून **त्यांच्या सेवा सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यास शासन मान्यता देत आहे.**

(अ) संबधित अध्यापकाची नियुक्ती नियमित स्वरुपात (Regular Basis) असावी.

(ब) संबंधित अध्यापकांची नियुक्ती विहीत केलेल्या सर्व कार्यपद्धतीचे अनुपालन करून केलेली असावी.

(क) संबंधित अध्यापकांच्या नियुक्तीस नेट/सेट अर्हतेची अट वगळता इतर सर्व विहीत अर्हता व अटींची पूर्तता करून विद्यापीठाकडून मान्यता देण्यात आलेली असावी.

(ड) संबंधित अध्यापकांचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यतेसाठी विद्यापीठाकडून सादर करण्यात आलेला असावा."

**४८.** या शिक्षकांच्या सेवा नियमित करण्याबाबत ज्या चार अटी या शासननिर्णयाने टाकलेल्या होत्या, त्याबद्दल कोणाचाही व कोणताही वाद नव्हता. मुख्य वाद होता तो **"त्यांच्या सेवा सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यास शासन मान्यता देत आहे."** या वाक्याच्या अर्थाबद्दल. शासनाचे म्हणणे असे होते की, त्यांची सेवा सर्व प्रयोजनार्थ शासननिर्णय निघाल्याच्या दिवसापासून धरली जाईल. संघटनेचे म्हणणे असे होते की, त्यांची सेवा सर्व प्रयोजनार्थ प्रथम नेमणुकीच्या दिनांकापासून धरली जाईल, असा या वाक्याचा अर्थ होतो. कारण "त्यांच्या सेवा" सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यास जर मान्यता देण्यात आली आहे तर ती उद्यापासून म्हणायची तर "त्यांची सेवा" या शब्दाला काहीच अर्थ उरत नाही. "त्यांच्या सेवा" या शब्दाचा अर्थ शासननिर्णय निघण्यापूर्वीची सेवा असाच होतो. शासननिर्णय निघाल्यानंतरच्या दिवसापासूनची सेवा धरायची तर सेवाकाळ निरंक होतो. मग त्यांची सेवा सर्व प्रयोजनार्थ धरण्यासाठीची त्यांची सेवा कोणती?

***** ***** *****

**४९.** स्वाभाविकपणे हा वाद न्यायालयात गेला. या प्रकरणी न्यायालयात काय निर्णय झाला, हे पहाण्यापूर्वी तत्सम प्रकरणी झालेल्या दुसऱ्या एका न्यायालयीन निर्णयाची माहिती करून घेणे आवश्यक आहे. राज्यशासनातील हंगामी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्याच्या बाबतीत दिनांक १ डिसेंबर १९९४ रोजी राज्यशासनाने एक शासननिर्णय निर्गमित केला होता. या शासननिर्णयामध्ये "Those who are in service on the date of this Government Resolution and those who fulfil all three following conditions, their services should be treated as regularised from the date of this Government Resolution." असे नमूद करण्यात आले होते. तेथे सुद्धा हाच वाद उपस्थित झाला. हे सर्व कर्मचारी न्यायालयामध्ये गेले. उच्च न्यायालयामध्ये दिनांक २८ एप्रिल २०१६ रोजी या प्रकरणाचा (W.P.No. 9051 of 2013) निकाल लागला. उपरोक्त वाक्याचा काय अर्थ होतो? हा प्रश्न या प्रकरणी उच्च न्यायालयात निकाली निघाला. *(P121NB2016)*

**५०.** हंगामी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करणाऱ्या १ डिसेंबर १९९४ च्या शासन निर्णयात असलेल्या त्या शब्दरचनेचे दोन अर्थ न्यायालयासमोर मांडण्यात आले. न्यायालयाच्या निर्णयाच्या परिच्छेद २५ व २६ मध्ये त्याबाबतचा उल्लेख आहे. तो पुढीलप्रमाणे :-

**(A)** "The crucial expression in the GR dated 1 December 1994, upon which both the sides have placed emphasis reads thus :"*........and those who are in service on the date of issue of this Government Resolution and those who fulfill all the three following conditions their services should be treated as regularized from the date of this Government Resolution*". In relation to the aforesaid GR dated 1 December 1994, **the learned counsel have suggested two constructions."** (See Para 25 & 26 of the High Court Judgment dated 28th April 2016)

**(B)** राज्यशासनातील हंगामी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत हा जो निर्णय झाला त्यावेळी सुनावणी होतांना 'त्या' वाक्याचा पहिला अर्थ हा शासकीय वकिलांनी मांडलेला असून न्यायालयाच्या निर्णयाच्या परिच्छेद २५ मध्ये तो उधृत करण्यात आलेला आहे. पुढीलप्रमाणे :-

**"The first interpretation,** as advocated by Mr. Kumbhakoni emphasises upon the expression **'from the date of this government resolution'** to suggest that the date of regularisation would be 1 December 1994 uniformly. As per this interpretation, the services rendered by the employees covered under the GR prior to 1 December 1994 cannot be treated as 'regular service' for any purposes whatsoever." (See Para 25 of the High Court Judgment dated 28th April 2016)

**(C)** कर्मचाऱ्यांच्या वतीने मांडण्यात आलेला दुसरा अर्थ या निर्णयाच्या परिच्छेद २५ मध्ये पुढील शब्दात नमूद करण्यात आलेला आहे :-

**"The second interpretation** as advocated by the respondent - employees emphasises upon the expression '**their services should be treated as regularised**' in the very same GR to suggest that the services rendered by the employees covered under the GR prior to 1 December 1994 stand regularised from the date of the government resolution. This means that the services of such employees prior to 1 December 1994 should be treated as 'regular service' for all purposes," (See Para 25 of the High Court Judgment dated 28th April 2016 )

**या प्रकरणाच्या सुनावणीच्या वेळी खरी व बिनचूक माहिती आम्ही न्यायालयासमोर ठेवली नाही म्हणून उच्च शिक्षण विभागाला बिनशर्त क्षमायाचना करावी लागली ही बाब उच्च शिक्षण विभागाची शोभा वाढविणारी नाही.**

*(लेखाचा परिच्छेद ३२ पहा)*

**(D)** दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर मा.खंडपीठाने निर्णयाच्या परिच्छेद २७ मध्ये आपला निर्णय पुढीलप्रमाणे मांडलेला आहे :-

"Therefore, at least the plain reading of the GR, does not fully support the construction suggested by Mr. Kumbhakoni. Rather, the expression makes use of the past tense i.e. '**regularised**', lending support to the construction that the past services were also intended to be regularised. Similarly, the use of the expression '**should be treated as**' once again lends support to the construction that the past services were intended to be treated as regularised." (See Para 27 of the High Court Judgment dated 28th April 2016)

**(E)** मा. उच्च न्यायालयाने या कर्मचाऱ्यांच्या बाजूने निर्णय दिला यावर सर्वोच्च न्यायालयात SLP दाखल न करता वित्त विभागाने ७ ऑक्टोबर २०१६ रोजी शासननिर्णय काढून या सर्व कर्मचाऱ्यांना पहिल्या दिवसापासून सेवा धरून पदोन्नतीचे लाभ दिलेत. याचे मुख्य कारण म्हणजे मा. सर्वोच्च न्यायालयाने तत्सम प्रकरणी २८.०९.२०१२ रोजी दिलेले आदेश हेच होय. *(P179NB2016)*

***** ***** *****

**५१.** नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या बाबतीत २७ जून २०१३ रोजीच्या शासननिर्णयामध्ये "**त्यांच्या सेवा सदर शासननिर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ गृहित धरण्यास शासन मान्यता देत आहे**" या वाक्याचा अर्थ काय होतो? याबाबत अनेक शिक्षकांना न्यायालयात जावे लागले व त्याबाबतीत सर्वच्या सर्व निर्णय शिक्षकांच्या बाजूने लागले.

**५१.१** नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनीच पेन्शन योजना लागू पडेल, याबाबतीत पहिला निर्णय हा दिनांक **३ ऑक्टोबर २०१८** रोजी मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने सन २०१७ च्या याचिका क्रमांक १३१६६ मध्ये दिलेला आहे. *(P120NB2018)* मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयाच्या परिच्छेद ६ मध्ये याचिकाकर्त्यांबाबतचे तपशील पुढील शब्दात नमूद आहेत :-

"We find that the contention raised on behalf of the Respondents are wholly untenable. Undisputedly, the **Petitioner when he was appointed in 1999 was possessing the requisite qualification except the net-set examination.** Not only this but the Petitioner's appointment was already approved by the Competent Authority and as such requisite scale was made applicable to the Petitioner till his retirement." *(P120NB2018)*

**५१.२** मा. खंडपीठाने आपल्या या निर्णयाच्या परिच्छेद ७ मध्ये शासनाचा २७ जून २०१३ चा संपूर्ण शासननिर्णय शब्दशः उधृत केलेला आहे व त्याबाबतचे खंडपीठाचे मत परिच्छेद ८ मध्ये पुढीलप्रमाणे नमूद केलेले आहे. :-

**"It can be thus seen that vide aforesaid G.R., the State Government has exempted the lecturers who are appointed between 23/10/1992 to 03/04/2000 and who were not possessing the net-set examination,** M.Phil. and Ph.D.qualification. Only requirement is that the appointment of these lecturers is required to be made after following due selection process. The other requirement is that appointment of such lecturers ought to have been approved by the University and University should have submitted the proposal for grant of approval of such teachers to the University Grant Commission."

**५१.३** या शिक्षकाची सेवा त्याच्या नेमणुकीच्या दिनांकापासून धरण्यात यावी असे मा.उच्च न्यायालयाच्या या आदेशाच्या परिच्छेद ९ मध्ये नमूद आहे. ते पुढील शब्दात :-

"Undisputedly, the Petitioners' appointment was made after following due selection process. Not only University as well as the Respondent -Joint Director of Education had also granted approval to the appointment of the Petitioner. **As such, it can be clearly seen that the Petitioner is entitled to the benefits of the said G.R. Undisputedly, the Petitioner's date of appointment is 20/9/1999 i.e. the date which falls between 23/10/1992 to 03/04/2000."**

**५२.** जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या संदर्भात दिनांक २७ जून २०१३ च्या शासननिर्णयात नमूद असलेल्या वाक्याचा काय अर्थ होतो? हे मा.उच्च न्यायालयाने या पहिल्या निर्णयात नमूद केले व त्याप्रमाणे पुढे अनेक खंडपीठांनी निर्णय देतांना तो अर्थ प्रमाणभूत मानला.

**५२.१** नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल

---

*(सहपत्र तीन : परिच्छेद ६०.१ पहा)*

**महाराष्ट्र शासन**

**कार्यालय, सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग,**

व्ही.एम.व्ही. परीसर, अमरावती - ४४४६०४

दुरध्वनी क्रमांक : ०७२१-२५३१२३५ फॅक्स : ०७२१-२५३१४५७

E-mail : jdheamt@yahoo.com Web : www.jdheamravati.org.in

क्रमांक : ससं/उशि/से.नि./२०१८/६०५ दिनांक : २२.०१.२०१९

प्रति,

प्राचार्य, डीग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन, अमरावती.

**विषय** :- श्री. राजेश वसंतराव पांडे, सहाय्यक प्राध्यापक, डीग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन, अमरावती यांचे सेवानिवृत्ती वेतनाचा प्रस्ताव मूळ सेवापुस्तकासह परत पाठविण्याबाबात.

**संदर्भ** :- (१) शासननिर्णय दिनांक २७.०६.२०१३ (२) आपले पत्र क्र. ८६, दिनांक २१.१२.२०१८.

आपल्या महाविद्यालयातून सेवानिवृत्त झालेले श्री. राजेश वसंतराव पांडे, सहाय्यक प्राध्यापक, डीग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन, अमरावती यांचे मूळ सेवापुस्तकाची व सेवानिवृत्ती वेतन प्रस्तावाची तपासणी केली असता ते सेट-नेट ग्रस्त असल्याचे दिसून येते. **त्यामुळे दिनांक २७ जून २०१३ च्या शासननिर्णयानुसार त्यांना सेवानिवृत्ती वेतन योजना लागू होत नाही.**

तरी श्री. राजेश वसंतराव पांडे, सहाय्यक प्राध्यापक, यांना शासननिर्णय २७ जून २०१३ नुसार अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू होत असल्याने श्री.राजेश वसंतराव पांडे, सहाय्यक प्राध्यापक, यांचा सेवानिवृत्ती वेतनाचा प्रस्ताव मा.महालेखाकार-II, कार्यालय नागपूर येथे पाठविता येणार नाही.

तरी श्री. राजेश वसंतराव पांडे, सहाय्यक प्राध्यापक, यांचा सेवानिवृत्ती वेतनाचा प्रस्ताव व मूळ सेवापुस्तक आपणाकडे परत पाठविण्यात येत आहे.

(डॉ. अशोक कळंबे)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
अमरावती विभाग, अमरावती.

**सहपत्र** :- मूळ सेवापुस्तक सेवानिवृत्ती वेतन प्रकरण.

---

*(सहपत्र चार : परिच्छेद ६०.२ पहा)*

**महाराष्ट्र शासन**

**कार्यालय, सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग,**

व्ही.एम.व्ही. परीसर, अमरावती - ४४४६०४

दुरध्वनी क्रमांक : ०७२१-२५३१२३५ फॅक्स : ०७२१-२५३१४५७

E-mail : jdheamt@yahoo.com Web : www.jdheamravati.org.in

क्रमांक : ससं/उशि/से.नि./२०१९/५००५ दिनांक : १९.०९.२०१९

प्रति,

प्राचार्य, डीग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन, अमरावती.

**विषय** :- श्री. सुनिल पुंडलीकराव जोशी, सहाय्यक प्राध्यापक, डीग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन, अमरावती यांचे सेवानिवृत्ती वेतन प्रकरणाबाबत.

**संदर्भ** :- (१) शासननिर्णय दिनांक २७.०६.२०१३ (२) आपले पत्र क्र. ५२, दिनांक १३.०८.२०१९.

आपल्या महाविद्यालयातील श्री. सुनिल पुंडलीकराव जोशी, सहाय्यक प्राध्यापक, यांच्या मूळ सेवापुस्तकाची तपासणी केली असता श्री. सुनिल पुं. जोशी यांना **दिनांक २७ जून २०१३ च्या शासननिर्णयानुसार सेवानिवृत्ती वेतन योजना लागू होत नाही.**

श्री. सुनिल पुंडलीकराव जोशी, यांना शासननिर्णय २७ जून २०१३ नुसार अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू होत असल्याने श्री. जोशी यांचे सेवानिवृत्ती वेतनाचा प्रस्ताव मा.महालेखाकार-II, कार्यालय नागपूर येथे पाठविता येणार नाही.

तरी श्री. सुनिल पुंडलीकराव जोशी, सहाय्यक प्राध्यापक, यांचा सेवानिवृत्ती वेतनाचा प्रस्ताव व मूळ सेवापुस्तक आपणाकडे परत पाठविण्यात येत आहे.

(डॉ. केशव तुपे)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
अमरावती विभाग, अमरावती.

**सहपत्र** :- मूळ सेवापुस्तक व सेवानिवृत्ती वेतन प्रकरण. (श्री. सुनिल पुंडलीकराव जोशी)

असे आदेशित करणारा असाच निर्णय मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक १२ डिसेंबर २०१८ रोजी सन २०१६ च्या याचिका क्रमांक १३०४ मध्ये दिला. *(P25NB2019)* या निर्णयामध्ये मा.खंडपीठाने दिनांक २७ जून २०१३ च्या शासननिर्णयाचा अर्थ मा.मुंबई खंडपीठाने पहिल्या निर्णयान्वये निश्चित करून दिलेला आहे असे स्पष्ट शब्दात नमूद केले ते पुढीलप्रमाणे :-

**"Government Resolution dated 27th June, 2013 has been interpreted by this Court at its Principal Seat in Writ Petition No. 13166 of 2017 under order dated 03rd October, 2018."**

५२.२ पहिल्या निर्णयात मा.मुंबई खंडपीठाने काय निश्चित केलेले आहे? हेही या निर्णयात मा.खंडपीठाने नमूद केले आहे ते पुढील शब्दात :-

**"It has been held by this Court that as per the said Government Resolution, the State Government has exempted the lecturers appointed between 23rd October, 1992 to 03rd April, 2000 from possessing the NET/SET qualification.** Appointment of the husband of the petitioner appears to have been approved even exemption has been granted by the University Grants Commission."

५२.३ दिनांक २७ जून २०१३ च्या शासननिर्णयाने या शिक्षकांच्या सेवा नियमित केलेल्या असल्यामुळे या शासननिर्णयाप्रमाणे कुटुंब निवृत्ती वेतन लाभार्थ्यांना सुद्धा जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल असेही या निर्णयात नमूद केले आहे ते पुढील शब्दात :-

"**The said Government Resolution would apply to the husband of the petitioner. The date of death and/or retirement would not make any difference.**" *(P25NB2019)*

५३. नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल असे नमूद करणारे मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या वेगवेगळ्या खंडपीठांनी आतापावेतो नऊ निर्णय दिलेले आहेत. **(सहपत्र : दोन पहा)** हे सर्व निर्णय निर्णयाच्या तारखेनुसार या सहपत्रात नमूद केलेले आहेत. यातील **पहिल्या प्रकरणात मा. खंडपीठाने दिलेला अर्थ प्रमाणभूत मानून पुढच्या आठही प्रकरणात मा.खंडपीठांनी आपले निर्णय दिलेले आहेत. तसे त्या प्रत्येक निर्णयात नमूद आहे. पहिल्या प्रकरणातील धोरणात्मक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने कायम केलेला असतांना उच्च शिक्षण विभागातील अधिकारी वारंवार प्रत्येक शिक्षकाला उच्च न्यायालयात का पाठवितात व उच्च न्यायालयात निर्णय झाल्यानंतर कधी कधी मधूनच सर्वोच्च न्यायालयात काही बाबतीत विशेष अनुमती याचिका दाखल करण्याचा खेळखंडोबा करतात** व असे करतांना कोण कोणते उद्योग करतात याची माहिती घेतली म्हणजे या अधिकाऱ्यांचे हेतू लक्षात आल्याशिवाय राहत नाहीत.

*(सहपत्र पाच : परिच्छेद ६०.३ पहा)*

**महाराष्ट्र शासन**

**कार्यालय, सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग,**

व्ही.एम.व्ही. परीसर, अमरावती - ४४४६०४

दुरध्वनी क्रमांक : ०७२१-२५३१२३५ फॅक्स : ०७२१-२५३१४५७

E-mail : jdheamt@yahoo.com Web : www.jdheamravati.org.in

क्रमांक : ससं/उशि/से.नि./२०१९/५००३ दिनांक : १९.०९.२०१९

प्रति,

प्राचार्य, विज्ञान महाविद्यालय, मलकापूर जि.बुलडाणा

**विषय** :- श्रीमती विभा निनाद सावजी, सहाय्यक प्राध्यापक, विज्ञान महाविद्यालय, मलकापूर जि.बुलडाणा यांचे सेवानिवृत्ती वेतन प्रकरणाबाबत.

**संदर्भ** :- (१) शासननिर्णय दिनांक २७.०६.२०१३ (२) आपले पत्र क्र. ३४२, दिनांक ०२.०७.२०१९.

आपल्या महाविद्यालयातील श्रीमती विभा निनाद सावजी, सहाय्यक प्राध्यापक, यांच्या मूळ सेवापुस्तकाची तपासणी केली असता श्रीमती विभा निनाद सावजी, यांना **दिनांक २७ जून २०१३ च्या शासननिर्णयानुसार सेवानिवृत्ती वेतन योजना लागू होत नाही.**

श्रीमती विभा निनाद सावजी, यांना शासननिर्णय २७ जून २०१३ नुसार अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू होत असल्याने स्व. बनचरे यांचे सेवानिवृत्ती वेतनाचा प्रस्ताव मा.महालेखाकार-II, कार्यालय नागपूर येथे पाठविता येणार नाही.

तरी श्रीमती विभा निनाद सावजी, सहाय्यक प्राध्यापक, यांचा सेवानिवृत्ती वेतनाचा प्रस्ताव व मूळ सेवापुस्तक आपणाकडे परत पाठविण्यात येत आहे.

(डॉ. केशव तुपे)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
अमरावती विभाग, अमरावती.

**सहपत्र** :- मूळ सेवापुस्तक व सेवानिवृत्ती वेतन प्रकरण. (श्रीमती विभा निनाद सावजी)

५४. शेकडो नेट-सेट मुक्त शिक्षकांना नेमणुकीच्या दिनांकापासून सेवा धरून जुन्या पेन्शन योजनेचे लाभ दिलेले असतांना उर्वरितांना ते नाकारण्याचा उद्योग हा लांछनास्पद उपद्रव या सदरातच मोडतो. राज्यशासनातील हंगामी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्या सेवा आश्वासित प्रगती योजनेच्या प्रयोजनार्थ नेमणुकीच्या दिनांकापासून धरण्याचा निर्णय दिनांक २८ एप्रिल २०१६ रोजी W.P.No.9051 of 2013 या प्रकरणामध्ये दिलेला आहे. (यापुढे उल्लेख हंगामी कर्मचाऱ्यांबाबत निर्णय असा) या निर्णयाच्या परिच्छेद २९ मध्ये मा. खंडपीठाने पुढील निष्कर्ष नोंदविला आहे :-

"The record indicates that such benefit has been extended by the State Government to hundreds of its employees by taking into consideration service from the date of initial appointment."

५४.१ अधिकृत कागदपत्रांचे अवलोकन करता नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत सुद्धा ४८४० (+ १५००) नेट-सेट मुक्त शिक्षकांना नेमणुकीच्या दिनांकापासून सेवा धरून सर्व लाभ अदा केलेले असतांना उरलेल्या ५१६० शिक्षकांना तत्सम लाभ लागू करण्यात हे अधिकारी नकार देत आहेत. याचे पुरावे मी सादर करू इच्छितो.

५४.२ महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही, (दिनांक ३ ऑगस्ट २००१) अधिकृत प्रतिवेदन, खंड १२५, क्रमांक १५ मधील पृष्ठ १४१ चे काळजीपूर्वक अवलोकन केले तर असे दिसून येते की सन १९९१ ते २००० या काळातील **नेट-सेट मुक्त शिक्षकांची संख्या दहा हजार असल्याची अधिकृत माहिती तत्कालीन मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी सभागृहात दिलेली आहे.** २७ जून २०१३ रोजी काढलेल्या शासन निर्णयाच्या परिच्छेद ६ मध्ये **अशा शिक्षकांची संख्या ही केवळ ५१६० असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे.** याचा सरळ अर्थ असा आहे की ३ ऑगस्ट २००१ ते २७ जून २०१३ या १२ वर्षांच्या कालखंडामध्ये जवळ जवळ (१००००-५१६०) = **४८४० शिक्षकांना नेमणूकीच्या दिनांकापासून त्यांची सेवा धरून CAS चे लाभ अदा करण्यात आलेले आहेत.** पुढे २७ जून २०१३ नंतर, १९ सप्टेंबर १९९१ ते २३ ऑक्टोबर १९९२ या कालखंडातील अंदाजे १५०० शिक्षकांना २७ जून २०१३ च्या शासननिर्णयाने हे लाभ अदा केलेले आहेत. *(P180NB2016)*

५४.३ सन १९९१ ते २००० या काळातील ४८४० शिक्षकांना ११ डिसेंबर १९९९ च्या शासननिर्णयातील परिच्छेद १२ ते १५ नुसार नेमणुकीच्या पहिल्या दिवसापासून सेवा धरून CAS चे लाभ अदा करण्यात आले. मात्र पुढील काळात त्यापैकी शेकडो शिक्षकांच्या प्रकरणी रिकव्हरी काढण्याचा राज्यशासनातील काही अधिकाऱ्यांनी 'उद्योग' केला होता. मा. उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी दिलेल्या अनेक निर्णयांनी असे प्रयत्न संपूर्णपणे बेकायदेशीर असल्याचे नमूद करून रद्दबातल (quashed and set aside) ठरविले. संघटनेच्या दप्तरी उपलब्ध असलेले त्यातील काही निर्णय पुढील प्रमाणे:-

**(1) W.P. No. 1893 OF 2010 :-** In the High Court of Judicature at Bombay Civil Appellate Jurisdiction : Writ Petition No.1893 of 2010 Pramod D.Sonawane ...Petitioner v/s. State of Maharashtra & ors....Respondents Coram: D.K.Deshmukh & N.D.Deshpande, JJ Dated: 3rd September, 2010 *(P8B2012)*

**(2) W.P. No. 1991 OF 2011 :-** In the High Court of Judicature at Bombay Bench at Aurangabad Writ Petition No. 1991 of 2011 Sheshrao Vyankatrao Shete & another Petitioners Versus The State of Maharashtra and others Respondents Coram : D.B. Bhosale & M.T. Joshi, JJ. Dated : 28th March, 2011 *(P9B2012)*

**(3) W.P. No. 5271 OF 2013 :-** In the High Court of Judicature of Bombay Bench at Aurangabad Writ Petition No.5271 of 2013 Coram : Mohit S. Shah, C.J. and Sunil P.Deshmukh, J. Date : 28th August 2013 Judgment (Per Sunil P.Deshmukh, J.) *(P145B2013)*

**(4) W.P. No. 4994 OF 2013 :-** In the High Court of Judicature of Bombay Bench at Aurangabad Writ Petition No. 4994 of 2013 [Coram : R . M. Borde and Sunil P.Deshmukh, J.J.] Date : 13th September 2013 Judgment (Per Sunil P.Deshmukh, J.) *(P205B2013)*

**(5) W.P. No. 6659 OF 2013 :-** In the High Court of Judicature of Bombay Bench at Aurangabad Writ Petition No.6659 of 2013 Dr.Uttam Pralhadrao Dolhare and Ors... Petitioners Versus The

State of Maharashtra, through its Secretary, Higher Education Department, Mantralaya, Mumbai. and Ors....Respondents Coram : R.M.Borde & Sunil P.Deshmukh, JJ. Date :10th October, 2013. Oral Judgment (Per Sunil P. Deshmukh, J.) *(P216B2013)*

**(6) W.P. NO. 5224 OF 2013 :-** In the High Court of Judicature at Bombay, Bench at Aurangabad. Writ Petition No. 5224 of 2013 Dr. Vishwanath Murlidharrao Ratnalikar age 51 years, occup. service, versus The State of Maharashtra, through its Secretary, Higher Education Department, Mantralaya, Mumbai Coram : R. M. Borde, and Sunil P. Deshmukh,JJ. September 26, 2013 : Oral Judgment (Per: Sunil P. Deshmukh, J.) Judgment circulated on page 151 of 2014 NUTA Bulletin.

**५४.४** वस्तुतः रिकव्हरीच्या या सर्व प्रकरणांमध्ये उच्च न्यायालयात थप्पड बसल्यानंतर सर्वोच्च न्यायालयात SLP दाखल करता आली असती पण एकाही प्रकरणात शासन सर्वोच्च न्यायालयात गेले नाही, त्यामुळे या सर्व शिक्षकांना मिळालेले लाभ अबाधित राहीले. ४८४० शिक्षकांना CAS चे हे लाभ नेमणुकीच्या दिनांकापासून त्यांची सेवा धरून दिनांक ११ डिसेंबर १९९९ च्या शासननिर्णयाप्रमाणे अदा केलेले आहेत. त्यांच्यापैकी शेकडो शिक्षकांना हे लाभ पदरी पडून पाच वर्षापेक्षा जास्त काळ झालेला आहे. **पाच वर्षापेक्षा जास्त काळ झालेला असल्यामुळे त्यांची रिकव्हरी काढण्याचा मार्ग सर्वोच्च न्यायालयाच्या एका महत्त्वपूर्ण निर्णयामुळे कायमचा बंद झालेला आहे.** मा. सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय दिनांक १८ डिसेंबर २०१४ रोजी झालेला असून तो संपूर्ण निर्णय सन २०१५ च्या नुटा बुलेटीनमध्ये पृष्ठ ३३ ते ३९ वर प्रसुत करण्यात आला आहे. ज्या पाच प्रकारामध्ये रिकव्हरी काढता येणार नाही, असे मा. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या या निर्णयाच्या परिच्छेद १२ मध्ये नमूद केले आहे त्यातील क्रमांक (iii) वरील प्रकार पुढील प्रमाणे आहे :-

"(iii) Recovery from employees, when the excess payment has been made for a period in excess of five years, before the order of recovery is issued."

वस्तुतः या प्रकरणी नियमाप्रमाणेच हे लाभ देण्यात आले आहेत. मात्र वादासाठी जादा (Excess Payment) पेमेंट झाले आहे हे शासनाचे म्हणणे क्षणभर मान्य केले तरी अनेक शिक्षकांच्या बाबतीत Recovery चे आदेश पाच वर्षानंतर काढण्यात आलेले आहेत व शेकडो शिक्षकांच्या बाबतीत ते आजही काढण्यात आलेले नाहीत, हे लक्षात घेतले पाहिजे. इथेतर रिकव्हरीचे आदेश मा.उच्च न्यायालयाने रद्दबातल ठरविल्यानंतर पुढे शासनाने कोणतीच कारवाई केलेली नाही.

***** ***** *****

**५५.** शासनातील हंगामी कर्मचाऱ्यांची सेवा आश्वासित प्रगती योजनेच्या प्रयोजनार्थ नेमणुकीच्या दिनांकापासून धरण्यात यावी असा जो उपरोक्त निर्णय मा.उच्च न्यायालयाने दिला त्याच्या परिच्छेद २९ मध्ये मा. खंडपीठाने पुढील निरीक्षण नोंदविले आहे :-

"It is quite clear that the State Government has again adopted a 'pick and choose' approach in the matter of challenges to the decisions of the MAT in favour of the employees. In some cases, the State Government has challenged the decisions of the MAT before this Court but in others, the decisions have been implemented without demur."

**५५.१** इथे नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीतसुद्धा "आवडीप्रमाणे निवडी" (pick and choose) या प्रकाराने धुमाकूळ घातलेला आहे.

(१) एकूण दहा हजारापैकी ज्या ४८४० शिक्षकांना नेमणुकीच्या दिनांकापासून सेवा धरून आश्वासित प्रगती योजनेचे लाभ दिलेले आहेत. त्यांच्या बाबतीत आवडीप्रमाणे निवडी करण्याचेच धोरण होते. कोणतेही न्यायसंगत सूत्र त्यामागे नव्हते.

(२) एकदा अधिकाऱ्यांच्या एका पिढीने या ४८४० शिक्षकांना लाभ दिल्यानंतर अधिकाऱ्यांच्या पुढच्या पिढीने त्यापैकी शेकडो शिक्षकांची "रिकव्हरी" काढतांना काही न्यायसंगत सूत्र समोर होते काय? तर या प्रश्नाचे उत्तरसुद्धा नकारार्थीच आहे. येथे नावडत्यांना रिकव्हरीसाठी निवडल्या गेले एवढेच त्याचे उत्तर आहे. न्यायसंगत सूत्र असते तर या सर्व प्रकरणी रिकव्हरीचे आदेश मा. उच्च न्यायालयाने रद्दबातल ठरविल्यानंतर या अधिकाऱ्यांच्या पुढच्या पिढीला सर्वोच्च न्यायालयात जाता आले असते. मात्र तसे एकाही प्रकरणात घडले नाही.

(३) १९९१ ते २००० या काळातील सर्व नेट-सेट मुक्त शिक्षक एकाच प्रकारामध्ये मोडत असतांना त्यातून १९ सप्टेंबर १९९१ ते २३ ऑक्टोबर १९९२ या काळातील शिक्षकांना अलग काढून सर्व लाभ देतांना वैयक्तिक आवडी निवडीचा प्रकार नसला तरी अशी विभागणी करण्यामागे कोणतेही न्यायसंगत सूत्र नव्हते हे उघड आहे.

(४) नेमणुकीच्या दिनांकापासून सेवा धरून शेकडो शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात आली. ती लागू करतांना फक्त त्यातील काहींनाच उच्च न्यायालयात जाण्यास भाग पाडतांना करण्यात आलेली 'निवड' ही 'आवड' या विषयाला धरूनच होती. या निवडी मागचे आधारभूत सूत्र हे लाजिरवाणे होते.

(५) एकदा उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर कोणाला सर्वोच्च न्यायालयात खेचायचे याबाबत काय न्यायसंगत सूत्र होते? मा.उच्च न्यायालयाचे याबाबतीत ९ निर्णय झालेत ते **सहपत्र दोन** मध्ये नमूद केलेले आहेत. त्यापैकी फक्त पहिल्या, तिसऱ्या व सहाव्या प्रकरणातील लाभधारकांना सर्वोच्च न्यायालयात ढकलण्यात आले. कोणत्या आधारावर? आम्ही म्हणू त्याला देऊ, आम्ही म्हणू त्याला देणार नाही हाच तो आधार.

**५५.२** उपरोक्त वर्णन लक्षात घेता "MAT" ऐवजी "High Court" आणि "This Court" ऐवजी "Supreme Court" एवढे शब्द बदलले की, मा.उच्च न्यायालयाने "pick and choose" धोरणाबाबत हंगामी कर्मचाऱ्यांच्या प्रकरणी हाणलेला पुढील ताशेरा नेट-सेट प्रकरण हाताळणाऱ्या अधिकाऱ्यांच्या गळ्यात किती शोभून दिसतो ते पहा :-

It is quite clear that the State Government has again adopted a 'pick and choose' approach in the matter of challenges to the decisions of the **High Court** in favour of the employees. In some cases, the State Government has challenged the decisions of the **High Court** before **Supreme Court** but in others, the decisions have been implemented without demur.

***** ***** *****

**५६.** मा. उच्च न्यायालयाने नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करण्याच्या बाबतीत दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ रोजी Writ Petition No. 13166 of 2017 (Shri Maruti Dattatraya Patil..Petitioner Vs. The State of Maharashtra and ors...Respondents) या प्रकरणात निर्णय दिला. ***(यापुढे उल्लेख मारुती पाटील प्रकरण असा)*** त्या निर्णयातील आदेश शब्दशः पुढीलप्रमाणे :-

**"ORDER**

(i) The impugned order dated 17/04/2017 is quashed and set aside.

(ii) The Respondents are directed to make the pension applicable to the Petitioner on the basis of his last drawn salary.

(iii) The pension is to be paid to the Petitioner from the month of November 2018. All the arrears between the date of superannuation till 31/10/2018 shall be cleared within a period of 3 months from today."

**५६.१** मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये राज्यशासनाने मारुती पाटील प्रकरणात विशेष अनुमती याचिका दाखल केली. ती मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १ मार्च २०१९ रोजी फेटाळून लावली. ती पुढील शब्दात :-

"Delay condoned. In the facts and circumstances of the present case and since the services of the first respondent were duly approved, we see no reason to entertain the Special Leave Petition. The Special Leave Petition is accordingly **dismissed.** Pending application, if any, stands disposed of."

**५६.२** मा. उच्च न्यायालयाने सन २०१९ च्या याचिका क्रमांक ७५५ (Ranpise Vijaykumar Baburao...Petitioner V/S. The State of Maharashtra & ors.... Respondents) या प्रकरणात दिनांक ९ एप्रिल २०१९ रोजी शब्दशः तसाच्या तसा निर्णय दिला. तो पुढीलप्रमाणे :-

**"ORDER**

(ii) The impugned order dated 14th January 2018 is quashed and set aside.

(iii) **The Respondents are directed to make the pension applicable to the petitioner on the basis of his last drawn salary.**

(iv) The pension is to be paid to the Petitioner from the month of May 2018. All the arrears between the date of superannuation till 30th April 2019 shall be paid within a period of three months from today."

**५६.३** हा वादग्रस्त विषय राहिलेला नाही. मुंबई खंडपीठाने ३ ऑक्टोबर २०१८ रोजी सन २०१७ च्या याचिका क्रमांक १३१६६ मध्ये हा वाद

निकाली काढलेला आहे व ज्या खंडपीठाने हा प्रश्न निकाली काढला त्या खंडपीठात जे ज्येष्ठ न्यायमूर्ती होते तेच ज्येष्ठ न्यायमूर्ती आज या खंडपीठात आहेत असा स्पष्ट उल्लेख या निर्णयाच्या परिच्छेद ८ मध्ये आहे तो पुढील शब्दात :-

"The issue is no more res integra. The Division Bench of this Court of which **one of us (Gavai, J) was a party,** through judgment and order dated 3rd October 2018 in Writ Petition No.13166/2017 (Maruti Dattatraya Patil Vs. The State of Maharashtra and ors.), has observed thus :

*"8. It can be thus seen that vide aforesaid G.R., the State Government has exempted the lecturers who are appointed between 23/10/1992 to 03/04/2000 and who were not possessing the net-set examination, M.Phil. and Ph.D. qualification. Only requirement is that the appointment of these lecturers is required to be made after following due selection process. The other requirement is that appointment of such lecturers ought to have been approved by the University and University should have submitted the proposal for grant of approval of such teachers to the University Grant Commission." (P103NB2019)*

५६.४ या सर्व प्रकरणामध्ये घटनांचे दिनांक लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

**(१) दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ :** मारुती पाटील प्रकरणातील मा.उच्च न्यायालयाचा निर्णय.

**(२) दिनांक १ मार्च २०१९ :** मारुती पाटील प्रकरणातील राज्यशासनाची विशेष अनुमती याचिका सर्वोच्च न्यायालयात 'डिसमिस' झाली.

**(३) दिनांक ९ एप्रिल २०१९ :** विजय रणपीसे प्रकरणात हे प्रकरण तत्सम असल्याचे नमूद करून (मारुती पाटील प्रकरणाप्रमाणे) तत्सम शब्दात मा. उच्च न्यायालयाचे आदेश.

**(४) दिनांक ५ डिसेंबर २०१९ :** बऱ्याच उशीराने का होईना उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी मारुती पाटील प्रकरणात पुढीलप्रमाणे यथायोग्य आदेश पारित केले ते पुढीलप्रमाणे :-

"३. उपरोक्त प्रमाणे मा. उच्च न्यायालयाने व मा. सर्वोच्च न्यायालयाने प्रस्तुत न्यायालयीन प्रकरणी दिलेल्या आदेशाचे अनुपालन करणे आवश्यक आहे. तेव्हा मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी उक्त नमूद याचिका क्र. १३१६६/२०१७ मध्ये दि. ०३.१०.२०१८ रोजी दिलेल्या आदेशाचे अनुपालन करण्यास सहमती देण्यात येत आहे. त्यानुषंगाने प्रकरणी पुढील कार्यवाही आपल्या स्तरावरून करण्यात यावी."

**(५) दिनांक २५ नोव्हेंबर २०१९ :** उपरोक्त ४ तारखांचा घटनाक्रम ठाऊक असतांना विजय रणपीसे प्रकरणात उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी पारित केलेले विक्षिप्त आदेश पुढीलप्रमाणे :-

"२. प्रस्तुत प्रकरणी शासनाच्या वतीने सरकारी वकिलांना आवश्यक ती माहिती देण्यासाठी तसेच शासनाच्या वतीने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्यासाठी आवश्यक ते प्रतिज्ञापत्र दाखल करण्यास विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. **प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सहपत्रासह :-** (३) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी तात्काळ नवी दिल्ली येथे जाऊन विशेष अनुमती याचिका दाखल करण्याची कार्यवाही करावी."

या प्रकरणातील SLP सुद्धा सर्वोच्च न्यायालयात पुढे दिनांक ७ फेब्रुवारी २०२० रोजी फेटाळली गेली, हा भाग वेगळा.

**५६.५ वस्तुस्थिती व कायद्याची स्थिती मारुती पाटील व विजय रणपीसे या दोनही प्रकरणात एकसारखी असल्यामुळे व मा. ज्येष्ठ न्यायमूर्ती दोनही प्रकरणात** निकाल देतांना त्या खंडपीठात न्यायमूर्ती असल्यामुळे दोनही प्रकरणात एकसमान निर्णय झाल्यानंतर व मारुती पाटील प्रकरणातील मा.उच्च न्यायालयाचा निर्णय मा.सर्वोच्च न्यायालयाने कायम केला, हे ठाऊक असतांनाही विजय रणपीसे प्रकरणात विशेष अनुमती याचिका दाखल करून या अधिकाऱ्यांनी बौद्धिक दिवाळखोरीचे प्रदर्शन केले. त्याबद्दल चौकशी होऊन जबाबदारी निश्चित केली जाणार नसेल तर उच्च शिक्षण विभागातील हे अराजक असेच फोफावत जाणार.

***** ***** *****

**५७. महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागातील अधिकारी सर्वोच्च न्यायालयासमोर सुद्धा शपथपत्रावर धडधडीत असत्य माहिती दाखल करतात, हे केवळ आश्चर्यकारक नव्हे तर खेदजनक व लाजिरवाणे सुद्धा आहे.** सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका दाखल करतांना सर्वोच्च न्यायालयातील शासकीय अधिवक्त्यांना योग्य ती माहिती पुरविणे याबाबतची जबाबदारी विशिष्ट अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आलेली असते. ज्यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे, ते अधिकारी किती बेजबाबदारपणे काम करतात व धडधडीत असत्य माहिती सर्वोच्च न्यायालयासमोर सादर करतात याचे पुरावे सादर करणे आवश्यक आहे. या परिच्छेदामध्ये :-

**(i)** पहिले प्रकरण याचा अर्थ मारुती दत्तात्रय पाटील विरुद्ध महाराष्ट्र शासन या वादी प्रतिवादी मध्ये मा.उच्च न्यायालयाने सन २०१७ च्या याचिका क्रमांक १३१६६ मध्ये दिनांक ०३.१०.२०१८ रोजी ज्या प्रकरणी निर्णय दिला ते प्रकरण होय.

**(ii)** दुसरे प्रकरण याचा अर्थ विजयकुमार बाबुराव रणपिसे विरुद्ध महाराष्ट्र शासन या वादी प्रतिवादी मध्ये मा.उच्च न्यायालयाने सन २०१९ च्या याचिका क्रमांक ७५५ मध्ये दिनांक ०९.०४.२०१९ रोजी ज्या प्रकरणी निर्णय दिला ते प्रकरण होय.

**(iii)** तिसरे प्रकरण याचा अर्थ राजेश वसंतराव पांडे विरुद्ध महाराष्ट्र शासन या वादी प्रतिवादी मध्ये मा.उच्च न्यायालयाने सन २०१९ च्या याचिका क्रमांक २०६८ मध्ये दिनांक २९.०७.२०१९ रोजी ज्या प्रकरणी निर्णय दिला ते प्रकरण होय.

५७.१ मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका दाखल करतांना एका तक्त्यामध्ये माहिती भरून तो तक्ता विशेष अनुमती याचिकेसोबत वर जोडावा लागतो. या तक्त्यात भरावयाची माहिती ही सर्वोच्च न्यायालयाच्या नियमांनी ठरवून दिलेली आहे. "PROFORMA FOR FIRST LISTING" असे या तक्त्याचे नाव आहे.

५७.२ दुसऱ्या प्रकरणात (In Special Leave Petition (Civil) Diary No(s).1076/2020) **"PROFORMA FOR FIRST LISTING"** या तक्त्याच्या स्तंभ सहामध्ये (अ) रकान्यात सर्वोच्च न्यायालयामध्ये तत्सम प्रकरण निकाली निघाले आहे काय? अशी एक विचारणा करण्यात आलेली आहे. त्या विचारणेला शासनातर्फे नकारार्थी उत्तर देण्यात आले आहे. शब्दशः पुढीलप्रमाणे :- 6. (a) Similar disposed of matter with citation, if any, & case. **त्यावर अधिकाऱ्यांनी दाखल केलेले उत्तर :** No similar matter is disposed of. असे आहे. त्यानंतर ६ (ब) मध्ये तत्सम प्रकरण प्रलंबित आहे काय? या विचारणेलासुद्धा नकारार्थी उत्तर देण्यात आले आहे. ते पुढीलप्रमाणे :- **तक्त्याप्रमाणे मूळ विचारणा :** (b) Similar pending matter with case details. (२) **त्यावर अधिकाऱ्यांनी दाखल केलेले उत्तर :** No similar matter is pending. असे आहे. **दोन्ही बाबतीत भरलेली ही माहिती पूर्णपणे असत्य आहे.**

वस्तुतः 6. (a) चे खरे उत्तर पुढीलप्रमाणे भरायला हवे होते :- Yes, similar matter is disposed of on 01.07.2019. Citation and case details are as follows :- (1) SLP No : Special Leave Petition (Civil) Diary No(s).14703/2019. (2) Arising out of impugned final judgment and order dated 03-10-2018 in WP No. 13166/2017 passed by the High Court of Judicature at Bombay. (3) The State of Maharashtra & Ors. Petitioner(s) **VERSUS** Maruti Dattatraya Patil & Ors. Respondent(s) (4) Date of Order : 01-07-2019.

आणि 6. (b) चे खरे उत्तर पुढीलप्रमाणे भरायला हवे होते :- Yes, similar matter is pending. Following are the case details:- (1) SLP No : Special Leave Petition (Civil) Diary No(s).1309/2020. (2) Arising out of impugned final judgment and order dated 29-07-2019 in WP No. 2068/2019 passed by the High Court of Judicature at Bombay At Nagpur. (3) The State of Maharashtra & Anr. Petitioner(s) **VERSUS** Rajesh Vasantrao Pande & Anr. Respondent(s).

५७.३ तिसऱ्या प्रकरणात (In Special Leave Petition (Civil) Diary No(s).1309/2020) **"PROFORMA FOR FIRST LISTING"** या तक्त्याच्या स्तंभ सहामध्ये (अ) रकान्यात सर्वोच्च न्यायालयामध्ये तत्सम प्रकरण निकाली निघाले आहे काय? या विचारणेला शासनातर्फे नकारार्थी उत्तर देण्यात आले आहे. **तक्त्याप्रमाणे मूळ विचारणा :** 6. (a) Similar disposed of matter with citation, if any, & case. **त्यावर अधिकाऱ्यांनी दाखल केलेले उत्तर :** No similar matter is disposed of. तसेच ६ (ब) मध्ये तत्सम प्रकरण प्रलंबित आहे काय? या विचारणेलासुद्धा नकारार्थी उत्तर देण्यात आले होते. ते पुढीलप्रमाणे :- **तक्त्याप्रमाणे मूळ विचारणा :** 6. (b) Similar pending matter with case details. **त्यावर अधिकाऱ्यांनी दाखल केलेले उत्तर :** No similar matter is pending. याही प्रकरणात ६ (अ) व ६ (ब) च्या रकान्यात **भरलेली माहिती ही पूर्णपणे असत्य आहे.**

वस्तुतः 6. (a) च्या समोर पुढीलप्रमाणे खरी माहिती नमूद करायला हवी होती :- Yes, similar matter is disposed of on 01.07.2019. Citation and case details are as follows :- (1) SLP No : Special Leave Petition (Civil) Diary No(s).14703/2019. (2) Arising out of impugned final judgment and order dated 03-10-2018 in WP No. 13166/2017 passed by the High Court of Judicature at Bombay. (3) The State of Maharashtra & Ors. Petitioner(s) **VERSUS** Maruti Dattatraya Patil & Ors. Respondent(s) Date of Order : 01-07-2019.

तसेच 6. (b) च्या समोर खरी माहिती पुढीलप्रमाणे भरायला हवी होती :- Yes, similar matter is pending. Following are the case details:- (1) SLP No : Special Leave Petition (Civil) Diary No(s).1076/ 2020. (2) Arising out of impugned final judgment and order dated 09-04-2019 in WP No. 755/2019 passed by the High Court of Judicature at Bombay. (3) The State of Maharashtra & Anr. Petitioner(s) **VERSUS** Ranpise Vijaykumar Baburao & Anr. Respondent(s).

**५७.४** संपूर्ण असत्य माहिती मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल करून आपल्याला यश मिळविता येईल या भ्रामक समजूतीमधून हा खोटारडेपणा करण्यात आला, हे उघड आहे. एक एक शिक्षक कुठे सर्वोच्च न्यायालयात जाणार? कुठे कागदपत्रे पहाणार? अशी निर्ढावलेली भावना यामागे असणार. या प्रकरणी संघटनेचे प्रतिनिधी दोन दिवस अगोदरपासून दिल्लीत मुक्काम ठोकून होते. आपल्या अधिवक्त्यांशी अगोदरच्या दिवशी तपशीलवार चर्चा या प्रतिनिधी मंडळाने केली होती. असत्य माहिती दाखल करणारांना त्या अपराधाबद्दल आपल्याविरुद्ध अवमान याचिका दाखल होऊ शकते हे माहीत होते, पण **शिक्षकांना आपले धोतर धुवायला वेळ अपुरा पडतो. तेव्हा अशा "अवमान धुलाई"च्या प्रकरणात शिक्षक कशाला पडतील? अशा निर्ढावलेपणाच्या पोटी अधिकाऱ्यांच्या हातून उपरोक्त प्रकार घडला असावा असे म्हणता येते.** संघटनेच्या अधिवक्त्यांनी माहिती पुरविणाराने खोटी माहिती पुरविली आहे, हे मा.न्यायालयाच्या लक्षात आणून दिल्यावर व दिल्यामुळे सुनावणीत असलेल्या याचिकेबाबतीत त्याचे बरेवाईट परिणाम खोटी माहिती पुरविणाराला भोगावेच लागतात. पण तिथल्या तिथे अवमान केल्याबद्दल शिक्षा होत नाही. त्यासाठी स्वतंत्रपणे अवमान याचिका दाखल करावी लागते. व्यक्तिशः एक एक शिक्षक अशी अवमान याचिका दाखल करू शकत नाही व ते शक्यही नसते.

**५८. नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी त्यांची सेवा नेमणुकीच्या दिनांकापासून धराबी लागेल असा २७ जून २०१३ च्या शासननिर्णयाचा अर्थ सांगणारे निर्णय मा.उच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या नऊ खंडपीठांनी दिले. सर्वोच्च न्यायालयाने त्या निर्णयांवर शिक्कामोर्तब करून राज्यशासनाच्या SLP 'डिसमिस' केल्या, तरी २७ जून २०१३ च्या शासननिर्णयाचे तुणतुणे वरपासून तर खालपर्यंत उच्च शिक्षण विभागातील सारेच अधिकारी उलट्या सुरात वाजवितात,** हा निव्वळ निर्बुद्धपणा आहे. त्यामुळे सलगपणे या तुणतुण्याचे तुणतुणे लक्षात घेणे आवश्यक आहे.

**५९.** याबाबतीत पहिला निर्णय हा दिनांक **३ ऑक्टोबर २०१८** रोजी मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने सन २०१७ च्या याचिका क्रमांक १३१६६ मध्ये दिलेला आहे. *(P120NB2018)* मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या परिच्छेद ७ मध्ये २७ जून २०१३ चा शासननिर्णय पूर्णपणे व शब्दशः उधृत केलेला आहे आणि या शासननिर्णयातील "**उपरोक्त चार अटी पूर्ण करणाऱ्या नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या सेवा नियमित करण्यात येत आहेत" या शासननिर्णयातील वाक्याचा अर्थ उच्च न्यायालयाच्या या निर्णयाने निश्चित केलेला आहे. त्याला जुनी पेन्शन योजनाच लागू होईल व त्या प्रयोजनार्थ त्याची सेवा नेमणुकीच्या दिनांकापासूनच धरावी लागेल. हा खंडपीठाने पहिल्या निर्णयामध्ये लावलेला अर्थ पुढच्या सर्वच खंडपीठांनी दिलेल्या निर्णयांमध्ये तसाच्या तसा मान्य केलेला असून मा. सर्वोच्च न्यायालयाचे त्यावर शिक्कामोर्तब झालेले आहे.**

**५९.१** नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल असे आदेशित करणारा दुसरा निर्णय सन २०१७ च्या याचिका क्रमांक १२१९ मध्ये दिनांक १९ ऑक्टोबर २०१८ रोजी मा.मुंबई खंडपीठाने दिला. पहिल्या निर्णयाचा स्पष्ट उल्लेख या दुसऱ्या निर्णयामध्ये करण्यात आला असून त्या सारखेच हे प्रकरण असल्याचे खंडपीठाने या निर्णयाच्या परिच्छेद तीन मध्ये नमूद केलेले आहे. ते पुढील शब्दात :-

"(3) The facts in the present case are almost identical with the facts in Writ Petition No.13166 of 2017, which has been allowed by Division Bench of this Court vide judgment dated 3rd October 2018. We therefore find it appropriate to allow this Petition in the light of the judgment of the Division Bench dated 3rd October 2018 passed in Writ Petition No.13166 of 2017." *(P137NB2018)*

**५९.२** नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल असे आदेशित करणारा तिसरा निर्णय मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक १२ डिसेंबर २०१८ रोजी सन २०१६ च्या याचिका क्रमांक १३०४ मध्ये दिला, असे दिसून येते. *(P25NB2019)*

या निर्णयामध्ये मा.खंडपीठाने दिनांक २७ जून २०१३ च्या शासननिर्णयाचा अर्थ मा.मुंबई खंडपीठाने पहिल्या निर्णयान्वये निश्चित करून दिलेला आहे असे स्पष्ट शब्दात नमूद केले ते पुढीलप्रमाणे :-

**"Government Resolution dated 27th June, 2013 has been interpreted by this Court at its Principal Seat in Writ Petition No. 13166 of 2017 under order dated 03rd October, 2018."**

पहिल्या निर्णयात मा.मुंबई खंडपीठाने काय निश्चित केलेले आहे? हेही या निर्णयात मा.खंडपीठाने नमूद केले आहे ते पुढील शब्दात :-

**"It has been held by this Court that as per the said Government Resolution, the State Government has exempted the lecturers appointed between 23rd October, 1992 to 03rd April, 2000 from possessing the NET/SET qualification.** Appointment of the husband of the petitioner appears to have been approved even exemption has been granted by the University Grants Commission."

**६०.** आतापावेतो मा.उच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या ९ खंडपीठांनी याबाबतीत शिक्षकांच्या बाजूने एकसारखे निर्णय दिलेले आहेत. त्यांचे तपशील **सहपत्र दोनमध्ये** नमूद केलेले आहेत. हा सारा खटाटोप मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयात सुरू असतांना उच्च शिक्षण विभागातील अधिकारी यांचे वर्तन कसे होते? याचा एक नमूना सादर करणे आवश्यक वाटते. सारे नमुने सादर करणे शक्य नाही.

**६०.१** डिसेंबर २०१८ पर्यंत अमरावती विभागात सेवानिवृत्त झालेल्या प्रत्येक नेट-सेट मुक्त शिक्षकाला जुनी पेन्शन योजनाच लागू करण्यात आली होती. मात्र जानेवारी २०१९ मध्ये नवे सहसंचालक अमरावती येथे आले व त्यांनी प्रा.राजेश पांडे यांच्या बाबतीत २२ जानेवारी २०१९ रोजी एक आदेश **(सहपत्र : तीन)** काढून त्यांना नवी पेन्शन योजना लागू होईल असे कळविले. राजेश पांडे यांना उच्च न्यायालयात जावे लागले. उच्च न्यायालयाने श्री. पांडे यांच्या बाजूने निर्णय दिला. तो **सहपत्र : दोन** मध्ये क्रमांक ६ वर नमूद आहे. शासन सर्वोच्च न्यायालयात गेले. सर्वोच्च न्यायालयाने शासनाची याचिका फेटाळून लावली. सर्वोच्च न्यायालयाचा तो निर्णय **सहपत्र : दोन** मध्ये क्रमांक ३ वर दिलेला आहे.

**६०.२** एवढे सारे महाभारत घडून गेल्यावरही अमरावतीच्या सहसंचालकांनी प्रा.सुनिल जोशी यांच्याबाबत १९ सप्टेंबर २०१९ रोजी एक आदेश **(सहपत्र : चार)** काढला व त्यांना नवी पेन्शन योजना लागू होईल असे कळविले. श्री. जोशी यांना उच्च न्यायालयात जावे लागले. मा.उच्च न्यायालयाने सहसंचालकांचा आदेश रद्द ठरविला व जोशी यांची सेवा पहिल्या दिवसापासून धरून त्यांना जुनी पेन्शन योजना लागू होईल असे आदेशीत केले. मा.उच्च न्यायालयाचा हा निर्णय **सहपत्र : दोन** मध्ये क्रमांक ८ वर नमूद केलेला आहे.

**६०.३** त्यानंतर अमरावतीच्या सहसंचालकांनी प्रा.श्रीमती विभा सावजी यांच्याबाबत १९ सप्टेंबर २०१९ रोजी एक आदेश **(सहपत्र : पाच)** काढला व त्यांना नवी पेन्शन योजना लागू होईल असे कळविले. प्रा.श्रीमती विभा सावजी यांना उच्च न्यायालयात जावे लागले. मा.उच्च न्यायालयाने सहसंचालकांचा आदेश रद्द ठरविला व जोशी यांची सेवा पहिल्या दिवसापासून धरून त्यांना जुनी पेन्शन योजना लागू होईल असे आदेशीत केले. मा.उच्च न्यायालयाचा हा निर्णय **सहपत्र : दोन** मध्ये क्रमांक ९ वर नमूद केलेला आहे.

**६१.** महाराष्ट्रातील वेगवेगळ्या विभागांचे सहसंचालक या विषयाबाबत काय करीत आहेत? याबाबत जी कागदपत्रे माझ्या दप्तरी उपलब्ध आहेत त्यांचे अवलोकन केले असता, ते सारे नकारघंटा वाजविणाऱ्या अमरावतीसारख्या आदेशांच्या "झेरॉक्स कॉप्या" काढीत आहेत असे म्हणता येईल किंवा त्यांच्या आदेशाच्या "झेरॉक्स कॉप्या" अमरावतीने काढल्या असे म्हणता येईल. त्यांच्या पैकी कोणालाही "भारत या नावाचा एक देश आहे, त्यात महाराष्ट्र नावाचे एक राज्य आहे, देशात एक सर्वोच्च न्यायालय आहे, महाराष्ट्रात एक उच्च न्यायालय आहे, त्याची तीन खंडपीठे महाराष्ट्रात आहे, भारताला आपली गौरवपूर्ण घटना आहे, या घटनेनुसार मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय बंधनकारक असतात" यातील काहीही ठाऊक नाही असे मानावे लागेल. अर्थात याबाबतीत एक गोष्ट त्यांच्या बाजूने स्पष्ट केली पाहिजे की, "उच्च न्यायालयाचे कितीही निर्णय झाले असले तरी व सर्वोच्च न्यायालयात आपण कितीही वेळा तोंडावर आपटलो तरी नवे कोणतेही प्रकरण आले की, त्याला नवी पेन्शन योजना लागू करा" असे लेखी आदेश काढण्याचे धैर्य नसलेल्या मंत्रालयातील अधिकाऱ्यांच्या

तोंडी आदेशावरून हे सारे सहसंचालक यंत्रवत वर्तन करीत आहेत. त्यातील एकाही अधिकाऱ्याने "**तुम्ही मला लेखी आदेश दिल्याशिवाय मी उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध कृती करणार नाही" असे आपल्या वरिष्ठांना कळविले नाही.**

**६१.१** तोंडी आदेशाचे पालन करण्याचा व एखाद्या सहसंचालकांनी नम्रपणे मतभेद व्यक्त करण्याचा मुद्दा समोर आल्यामुळे यापूर्वीचा एक अनुभव नमूद करावासा वाटतो. चौथ्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीच्या वेळी दिनांक २७ फेब्रुवारी १९८९ च्या शासननिर्णयाने तीन वेतनश्रेण्यांची व्यवस्था निर्माण केली होती. कार्यभार अवास्तव वाढविण्याचे कारस्थान अयशस्वी झाल्यामुळे चिडलेल्या उच्च शिक्षण सचिवांनी "**शासननिर्णयात जरी तीन वेतनश्रेण्या असल्या तरी सर्वांची वेतननिश्चिती तळच्या वेतनश्रेणीत करा**" असे तोंडी आदेश संचालक व प्रशासन अधिकाऱ्यांना दिले. संचालक हुशार, त्यांनी प्रशासन अधिकाऱ्यांची बैठक घेतली व सर्वांना तसे आदेश दिले. त्या बैठकीच्या कार्यवृत्तात त्याची नोंद केली नाही. **आजच्या सहसंचालक पदापेक्षा त्यावेळचे प्रशासन अधिकाऱ्यांचे पद हे बरेच कनिष्ठ दर्जाचे पद होते. मात्र तोंडी आदेश देणे, कार्यवृत्तात त्याची नोंद न करणे यामागील मर्म सर्वांच्या नसले तरी काहींच्या लक्षात आल्याशिवाय राहिले नाही.**

**६१.२** दिनांक २१ जून १९८९ रोजी प्रशासन अधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, अमरावती विभाग, अमरावती यांनी एक परिपत्रक (क्रमांक : प्र.अ./उशी/अनु-३/१/८९-९०) काढून "**तूर्त अधिव्याख्यात्यांची वेतननिश्चिती रु. २२००-४००० या वेतनश्रेणीत करावयाची आहे**" असे फर्मान काढले. प्रशासन अधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, नागपूर विभाग, नागपूर यांनी तेथे प्राचार्यांच्या एका बैठकीमध्ये अशाच प्रकारची माहिती दिली. शासननिर्णयात जरी मूळ वेतनश्रेणी, वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी अशा तीन वेतनश्रेण्या असल्या तरी सर्वांना सध्या मूळ म्हणजे खालच्या वेतनश्रेणीतच टाकण्याचे तोंडी धोरण सचिवांनी ठरविले होते. नागपूरचे प्रशासन अधिकारी तोंडी काहीही सांगत असले तरी वरून लेखी आदेश आल्याशिवाय सर्वांना एकाच वेतनश्रेणीत टाकण्याचे लेखी आदेश काढायला तयार नव्हते. एका युद्धभूमीवर पराक्रम गाजविलेल्या सेनापतीला जसे तसाच पराक्रम गाजविण्यासाठी दुसऱ्या युद्धभूमीवर पाठविले जाते, त्या थाटात जून १९८९ मध्ये 'वरच्या' तोंडी आदेशावरून अमरावती येथे लेखी आदेश काढण्याचा मोठा पराक्रम गाजविलेल्या अमरावतीच्या प्रशासन अधिकाऱ्याची नागपूर येथे बदली करण्यात आली. त्या अधिकाऱ्यांनी तेथे जावून ११ जुलै १९८९ रोजी अमरावती सारखे (खरे म्हणजे अमरावतीपेक्षा 'तेजस्वी') परिपत्रक नागपूर येथे निर्गमित केले.

**६१.३** कोल्हापूरचा प्रशासन अधिकारी या सर्वांचा बाप निघाला. त्याने मोठीच बहार केली. प्रशासन अधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी दिनांक २१ जून १९८९ रोजी तेथे एक परिपत्रक (क्रमांक : प्रअ/उशि/अ/कोवि/८९-९०/२९९१-३०८८) काढले. त्या विभागातील सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना ते पाठविले. त्या पत्राची प्रत शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) पुणे यांना पृष्ठांकीत केली. पृष्ठांकनातील परिच्छेद ३ मध्ये अशी "धारणा-विचारणा" केली होती की, :-

"३. विद्यापीठाकडून उपरोक्त सिनिअर स्केल व सिलेक्शन ग्रेड संबंधी शासन / विद्यापीठ यांचेकडून व्यक्तीनिहाय/पदनिहाय स्पष्टता होईपर्यंत **सर्व शिक्षक रुपये २२००-४००० ही वेतनश्रेणी मिळण्यास पात्र समजून त्याप्रमाणे वेतननिश्चिती करावयाची आहे अशी या कार्यालयाची धारणा असून ती त्वरीत पक्की करून या कार्यालयास कळवावे. यासंदर्भात शिक्षण संचालनालयाकडील आदेश प्राप्त झाल्यावरच वेतननिश्चिती मान्य करण्याबाबतची कार्यवाही कार्यान्वित केली जाईल. करिता तात्काळ धारणा निश्चित करून कळवावे ही विनंती.**"

वेगळ्या शब्दात सांगायचे झाल्यास प्रशासन अधिकारी या लहानशा पदावरून काम करणाऱ्या कोल्हापूरच्या या अधिकाऱ्याने संचालक उच्च शिक्षण यांना असे बजावले होते की, शासननिर्णयाच्या विरोधात काम करायला तोंडी आदेश तुम्ही आम्हाला देता, आता मी तसे सर्व प्राचार्यांना पाठविलेल्या पत्रात तुमचे म्हणणे लेखी नमूद केले आहे. तुम्ही माझी ही धारणा बरोबर आहे असे लेखी कळवा, नंतरच मी पुढचे काम सुरू करीन. प्रशासन अधिकारी या पदापेक्षा सहसंचालक उच्च शिक्षण हे बरेच वरचे पद आहे. **आजच्या एकाही सहसंचालकाने "आपण सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय हे शब्द ऐकलेले आहेत. त्यांच्या आदेशाचे घटनात्मक स्थान आम्हाला माहीत आहे" असे कळवू नये, हे महाराष्ट्राच्या उच्च शिक्षणक्षेत्राचे दुर्दैव होय.**

**६१.४** तोंडी आदेश देण्याचा आजचा प्रकार जसा बेकायदेशीर आहे, तसा तो त्यावेळीही होता. त्यामुळे शासनाला अमरावती व नागपूरची परिपत्रके रद्द करावी लागली. महाराष्ट्र विधानपरिषदेमध्ये शुक्रवार, दिनांक २० ऑक्टोबर १९८९ रोजी लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने हा विषय चर्चेला आला. "**दिनांक २७ फेब्रुवारी १९८९ च्या शासननिर्णयाप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे याची जाणीव प्रशासन अधिकाऱ्यांना देण्यात यावी व संबंधित परिपत्रक रद्द करण्यात यावे**" अशा सूचना उच्च शिक्षण संचालकांना देण्यात आलेल्या आहेत असे या निवेदनाच्या शेवटी नमूद करण्यात आले होते. तो शेवटचा परिच्छेद पुढीलप्रमाणेः-

"शासन आदेशानुसार वरील नवीन वेतनश्रेणी लागू करण्याबाबत विद्यापीठांनी अध्यादेश काढावयाचे होते. त्याप्रमाणे विद्यापीठाने निरनिराळ्या तारखांना अध्यादेश काढलेले आहेत. शासन निर्णय, दिनांक ७ जुलै १९८९ अन्वये ज्या दिनांकापासून संबंधित विद्यापीठांनी वेतनश्रेणी लागू करण्याबाबत अध्यादेश दिलेले आहेत त्या दिनांकापासून ३ महिन्याचे आत विकल्प देण्याची मुदत वाढविण्यात आलेली आहे. वरिष्ठ/निवडश्रेणीत कोणत्या पद्धतीने पदोन्नती घ्यावयाची याबाबत विद्यापीठाने आदेश काढलेले नाहीत. **शासन निर्णय, दिनांक २७ फेब्रुवारी १९८९ प्रमाणेच कार्यवाही करावयाची आहे याची जाणीव प्रशासन अधिकारी यांना देण्यात येत असून संबंधित परिपत्रके रद्द करण्याबाबत सूचना शिक्षण संचालनालय स्तरावर दिनांक १ ऑगस्ट १९८९ रोजी देण्यात आल्या आहेत.**" *(महाराष्ट्र विधान परिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : खंड ८६, क्रमांक १४, पृष्ठ ४६)*

**६१.५** या प्रशासन अधिकाऱ्याला पत्रक काढतांना संदर्भामध्ये शासन आदेशाची तारीखसुद्धा बरोबर टाकता आली नाही ही गोष्ट खरी आहे काय? अशी विचारणा केली असता "इसमें थोडी मिस्टेकस् है." असे राज्यमंत्र्यांनी कबूल केले व "**सरकार ने उसको विदड्रा कर लिया है.**" असेही सांगितले. ती चर्चा पुढीलप्रमाणे :-

"**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, अमरावतीला या प्रशासन अधिकाऱ्याने २१ जूनला जे आदेश काढले आहेत त्याचा संदर्भ पहा त्यात ज्या १७-२-८९ च्या आदेशानुसार पुढील कारवाई आपणास करावयाची आहे. त्याचा दिनांकसुद्धा संदर्भामध्ये बरोबर टाकलेला नाही हे खरे आहे काय?

**प्रा.जावेदखान** : अध्यक्ष महोदय, **इसमें थोडी मिस्टेकस् है. सरकार ने उसको विदड्रा कर लिया है.**" *(महाराष्ट्र विधान परिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : खंड ८६, क्रमांक १४, पृष्ठ ४७)*

**६१.६** नागपूरच्या प्रशासन अधिकाऱ्यांच्या परिपत्रकातील प्रत्येक वाक्य चुकीचे आहे याबाबतीत सभागृहाची खात्री झाली होती. सभागृहातील ज्येष्ठ सदस्य श्री. विठ्ठलराव हांडे यांनी तर सरळ सरळ **पैसे खाण्याकरिता हे परिपत्रक त्याने काढले आहे** असा आरोप केला. खुद्द सभापतींनी त्यावर "माननीय मंत्रिमहोदयांनी याबाबत योग्य ती कारवाई केली पाहिजे, नाहीतर असे प्रकार वाढत जातील" असे उद्‌गार काढले. शेवटी राज्यमंत्र्यांनी "केस एस्टाब्लिश होने पर उसको सस्पेंड कर देंगे. इन्क्वायरी करने पर जो भी सजा होगी दी जाएगी." असे सांगितले. ती चर्चा पुढीलप्रमाणे :-

"**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, या ठिकाणी फायदा मिळविण्याच्या हेतूनेच हे परिपत्रक काढले आहे. या ठिकाणी जर त्या अधिकाऱ्याने चुकीची गोष्ट केली असेल तर त्या अधिकाऱ्याला आपण सस्पेंड का करीत नाही? यामध्ये आपल्याला कोणती अडचण आहे?

**प्रा.जावेद खान** : अध्यक्ष महोदय, पुरी जांच-पडताल करने के बाद....

**सभापती** : या ठिकाणी चौकशी करण्याचा प्रश्नच येत नाही. या ठिकाणी त्या अधिकाऱ्याने प्रत्येक वाक्यात चूक केली आहे असे दिसून येत आहे.

**श्री.वि.ग.हांडे** : अध्यक्ष महाराज, या ठिकाणी संबंधीत अधिकाऱ्याने हे जे परिपत्रक काढले आहे, ते दुसरा हेतू डोळ्यासमोर ठेवून केले आहे. काढले आहे. **पैसे खाण्याकरिताच हे परिपत्रक त्या अधिकाऱ्याने काढले आहे.** म्हणून त्या अधिकाऱ्याविरुद्ध आपण कोणती ॲक्शन घेणार आहात?

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांनी याबाबत योग्य ती कारवाई केली पाहिजे, नाहीतर असे प्रकार वाढत जातील.

**प्रा.जावेद खान** : अध्यक्ष महोदय, प्रायमाफेसी केस एस्टाब्लिश होने पर उसको सस्पेंड भी कर देंगे. इन्क्वायरी करने पर जो भी सजा होगी दी जाएगी." *(महाराष्ट्र विधान परिषद कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन : खंड ८६, क्रमांक १४, पृष्ठ ४८)*

***** ***** *****

**६२.** नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनीच पेन्शन योजना लागू करण्याच्या विरोधात उच्च शिक्षण विभागातील अधिकारी २७ जून २०१३ च्या शासननिर्णयाचे वाजवित असलेले तुणतुणे किती निरर्थक आहे? याची तपशीलवार माहिती पूर्व परिच्छेदातून दिलेली आहे. मा.उच्च न्यायालयाने दिनांक २३ डिसेंबर २०१५ रोजी W.P.No. 2082 of 2013 या प्रकरणामध्ये दिलेला निर्णय (यापुढे उल्लेख डिसेंबर २०१५ चा निर्णय) लक्षात घेण्यासारखा आहे. या निर्णयाविषयीच्या अत्यंत भ्रामक कल्पनांनी उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना पछाडलेले आहे. या निर्णयाविषयीचे या अधिकाऱ्यांचे आकलन काय आहे? हे प्रथम पाहू व त्यानंतर त्या आकलनातील गफलतीचे आकलन करू.

**६२.१** दिनांक १० ऑगस्ट २०२० रोजीच्या नागपूरहून प्रसिद्ध होणाऱ्या दैनिक 'लोकमत'च्या आवृत्तीमध्ये अमरावतीचे उच्च शिक्षण सहसंचालक यांचा नावानिशी व पदानिशी एक खुलासा प्रसिद्ध झालेला आहे. तो शब्दशः पुढीलप्रमाणेः-

"२७ जून २०१३ रोजीचा शासनादेश मुंबई उच्च न्यायालयाने २३ डिसेंबर २०१५ रोजी कायम ठेवला. प्राध्यापक नेट-सेट, पीएचडी धारण करतील तेव्हा त्यांना लाभ लागू होईल. या निर्णयाविरुद्ध प्राध्यापकांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली आहे. अद्यापपर्यंत या याचिकेवर निर्णय झालेला नाही. - केशव तुपे, सहसंचालक, उच्च व तंत्र शिक्षण, अमरावती."

नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू न करण्यासाठी उपरोक्त भूमिका ही निरुपयोगी आहे. अर्थात ही अमरावती सहसंचालकांची त्यांच्या स्तरावरील भूमिका नसून मंत्रालयातील भूमिकेचा तो यंत्रवत पुनरुच्चार आहे. तथापि, हे नमूद केलेच पाहिजे की, त्यांच्या या खुलाशातील "**या निर्णयाविरुद्ध प्राध्यापकांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली आहे. अद्यापपर्यंत या याचिकेवर निर्णय झालेला नाही.**" हा मजकूर जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या बाबतीत वस्तुस्थितीवर आधारित नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, जुनीच पेन्शन योजना लागू करण्यात यावी याबाबत मा.उच्च न्यायालयाचे नऊ निर्णय या शिक्षकांच्या बाजूने झाले असून ते सर्वोच्च न्यायालयात कायम झाले आहेत. **(सहपत्र : दोन पहा.)**

**६२.२** याबाबत मंत्रालयातील अधिकाऱ्यांची काय भूमिका आहे? हे मी अधिकृत कागदपत्रांच्या आधारे नमूद करू इच्छितो. दिनांक ५ मार्च २०२० रोजी राज्याच्या मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या शिष्टमंडळाला चर्चेसाठी बोलाविले होते. या चर्चेच्या वेळी उच्च शिक्षण खात्यातर्फे "**मा.मंत्रिमहोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ५ मार्च २०२० रोजी आयोजित महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या विविध मागण्यांसंदर्भातील बैठकीची टिपणी**" या मथळ्याची एक टिपणी विभागातर्फे तयार करण्यात आली होती. या टिपणीमध्ये क्रमांक १० वर "**२३ ऑक्टोबर १९९२ ते ३ एप्रिल २००० दरम्यान निवृत्त झालेल्या नेट-सेट मुक्त शिक्षकांना मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार जुन्या पेन्शन योजनेचे लाभ देण्याबाबत**" ही महासंघाची मागणी होती व त्या टिपणीमध्ये "मा.उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक २०८२/२०१३ व इतर सर्व समान विषयाच्या याचिकांमध्ये **दिनांक २३.१२.२०१५ रोजी निकाल देऊन शासननिर्णय दिनांक २७ जून २०१३ 'upheld' केला,**" असे उच्च शिक्षण विभागाचे अभिप्राय नमूद होते. या टिपणीमध्ये या मुद्यावरील मजकुराच्या शेवटी "मा.उच्च न्यायालयामध्ये सदर प्रलंबित याचिकांपैकी १५ याचिकांमध्ये शासनाच्या ध्येय धोरणाच्या विरोधात निकाल पारित करण्यात आलेले आहेत. **त्या निकालांच्या विरोधात 'Review' आणि 'SLP' दाखल करण्याची कार्यवाही सुरू असून त्यापैकी तीन याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावलेल्या आहेत,**" असेही विभागाच्या अभिप्रायात नमूद करण्यात आलेले होते.

**६२.३** महासंघाच्या व घटक संघटनांच्या स्तरावर याबाबतीत शासनाच्या विरोधात गेलेल्या नऊ निर्णयांच्या प्रती उपलब्ध असल्यामुळे **सहपत्र : दोन** मध्ये या याचिकांची संख्या नऊच दाखविलेली आहे. पण विभागाच्या उपरोक्त अभिप्रायावरुन शासनाच्या विरोधात गेलेल्या याचिकांची संख्या १५ आहे असे दिसून येते. सर्वोच्च न्यायालयात SLP फेटाळल्याची तीन ही संख्या मात्र उभयपक्षी मान्य आहे, असे दिसून येते. राज्यशासनाच्या तीन विशेष अनुमती याचिका सर्वोच्च न्यायालयात फेटाळल्यानंतरही बुद्धी ठिकाणावर न आलेले अधिकारी मंत्रालयात बसलेले असतील तर अमरावतीच्या सहसंचालकांना किती दोष द्यायचा? **मूळ आणि बुंधा सडलेला असेल तर फांद्यांना सडण्याचा अधिकार कोणीही नाकारू शकत नाही.**

**६२.४** दिनांक २३ डिसेंबर २०१५ च्या उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या परिच्छेद ३७ मध्ये पेन्शन ग्रॅच्युईटीसह यापूर्वी मिळत असलेले सर्व लाभ त्यांना मिळत राहतील, याबाबतीत काही प्रश्न नाही असे स्पष्ट शब्दात नमूद केलेले आहे, ते पुढीलप्रमाणे:-

"There is no issue that non-NET/SET teachers, inspite of no requisite qualification of NET/SET have been getting pay Commission's scale, HRA, Leave Travel Allowance, DA, TA and all other related benefits, **including increments and pension and gratuity.**" *(See Para 37 of the December 2015 Judgement)*

**६२.५** दिनांक २३ डिसेंबर २०१५ च्या मा.उच्च न्यायालयाच्या खंडपीठाच्या निर्णयाच्या परिच्छेद ३७ मध्ये काय म्हटले आहे? यापेक्षा जास्त महत्त्वाचा या निर्णयातील परिच्छेद ८८ आहे. सर्वोच्च न्यायालयाने या शिक्षकांना लाभ देणारे अंतरिम आदेश पारित केलेले आहेत, ते आपण रद्द करू शकत नाही तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशाच्या आधारावर उच्च न्यायालयाच्या अनेक खंडपीठांनी या शिक्षकांना लाभ देणारे अंतरिम आदेश पारित केले होते, तेही आपण रद्द करू शकत नाही याची जाणीव असल्यामुळे २३ डिसेंबर २०१५ चा निर्णय देणाऱ्या खंडपीठाने आपल्याच निर्णयाला स्वयंस्थगिती दिलेली आहे व त्या निर्णयाला मा.सर्वोच्च न्यायालयच स्थगनावस्थेतून बाहेर काढू शकेल असेही नमूद केले आहे. आजपर्यंत मा.सर्वोच्च न्यायालयाने २३ डिसेंबर २०१५ च्या उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगनावस्थेतून बाहेर काढलेले नाही. त्यामुळे तो निर्णय स्वयंस्थगनावस्थेतच आहे.

**६२.६** दिनांक २३ डिसेंबर २०१५ च्या मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयातील परिच्छेद ८८ मधील स्वयंस्थगनादेश समाविष्ट असलेला मजकूर मी पुढे शब्दशः उधृत करीत आहे. तो पुढीलप्रमाणे :-

"However, in view of the fact that the matters are pending in Supreme Court and as we have decided these matters based upon the orders passed by the Supreme Court, pending the Appeals and the Special Leave Petitions, we are inclined to observe that **this judgment shall not be given effect, so far as the order of vacating interim orders are concerned, till the Supreme Court passes an appropriate order.** The Respondents/parties, if required, to take any steps based upon this judgment, shall be after further order of the Supreme Court."

**(A)** मा.सर्वोच्च न्यायालय यथोचित आदेश पारित करीत नाही, तोपर्यंत अंतरिम आदेश निरस्त करण्यासाठी आमच्या या निर्णयाचा कोणालाही वापर करता येणार नाही. (this judgment shall not be given effect, so far as the order of vacating interim orders are concerned, till the Supreme Court passes an appropriate order.)

**(B)** राज्यशासनाला (Respondents) किंवा इतर कोणत्याही पक्षकाराला (Parties) आमच्या या निर्णयाच्या आधारावर कोणतीही कारवाई करता येणार नाही किंवा आदेश (Any Steps) काढता येणार नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाकडून आदेश घेतल्यानंतरच अशा Steps घेता येतील. या निर्णयाच्या बाबतीत मा.सर्वोच्च न्यायालयाने कोणतेही आदेश पारित केलेले नसल्यामुळे डिसेंबर २०१५ चा मा.मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय आजही स्वयंस्थगनावस्थेतच आहे. (The Respondents/parties, if required, to take any steps based upon this judgment, shall be after further order of the Supreme Court.)

**६३.** शेवटी एवढेच म्हणता येईल की, २७ जून २०१३ चा शासननिर्णय काय किंवा २३ डिसेंबर २०१५ चा मा. उच्च न्यायालयाचा निर्णय काय? यापैकी कोणीही नवी पेन्शन योजना नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बोकांडी बसविण्यासाठी कामी येणार नाही, हे उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या जेवढे लवकर लक्षात येईल, तेवढी त्या विभागाची बेअब्रु कमी होईल. मा. सर्वोच्च न्यायालयाने याबाबतीत काय निर्णय दिलेले आहेत, हे अधिकाऱ्यांच्या जोपर्यंत लक्षात येत नाही, तोपर्यंत या शिक्षकांना यातना भोगाव्या लागतील हे उच्च शिक्षण क्षेत्राचे दुर्दैव होय.

*****

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2018-20 (Uploaded on www.nuta.in on 23.08.2020) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 01.09.2020**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

To,...................................................................

......................................................................

......................................................................

......................................................................